रायगड, सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

HIRING ALERT
Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.



आशा भोसले यांचे निधन
१९३३-२०२६

# सप्तसुरांची सम्राज्ञी हरपली

## वयाच्या ९३ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

## सोमवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

| मुंबई | प्रतिनिधी |

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले या पाच अक्षरांची सात दशकांहून अधिक काळ चाललेली सप्तसुरांची मैफल आज विसावली. पिढ्यान् पिढ्यांवर आपल्या अलौकिक स्वरांची मोहिनी घालणारी सूरसम्राज्ञी आशा भोसले यांनी ९३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांना शनिवारी हृदयविकाराचा झटका आल्याने ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्या बऱ्या व्हाव्यात म्हणून देशभर प्रार्थना सुरू होत्या. मात्र, प्रार्थनांचेच बळ जणू कमी पडले आणि आशा भोसले यांच्या निधनाची बातमी थडकली. रविवारी (दि.१२) त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी त्यांचे सुपुत्र आनंद भोसले यांनी प्रसारमाध्यमांना दिली आणि उभा देश शोकसागरात बुडाला. आज सोमवारी (दि.१३) मुंबईतील शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर दुपारी चारनंतर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. •> पान २ वर



## महाराष्ट्राचे भूषण आशा अन् लता मंगेशकर

संपूर्ण विश्वावर ज्या दोन बहिणींच्या आवाजाने जादू केली अशा दोन बहिणी म्हणजे आशा ताई भोसले आणि लता दीदी मंगेशकर. वयाच्या अगदी १० व्या वर्षापासून त्यांच्या संगीतमय प्रवासाला सुरुवात झाली. दोन्ही बहिणींची शास्त्रीय संगीतावर विलक्षण पकड होती. आशा भोसले यांनी तब्बल ९०० चित्रपटांमध्ये गाणी गायली. तर लता मंगेशकर यांच्या मंत्रमुग्ध आवाजाने सर्वांना मोहित केले. आशाताई भोसले यांनी १२ हजारांहून अधिक गाणी गाऊन प्रत्येकाला थिरकायला लावले. त्यांच्या आवाजातील जादू तरुणाईला अक्षरशः धुंदावले. आशा भोसले यांचा चिरतरुण आवाज एक जोशपूर्ण वातावरण निर्माण करत असे. आशा भोसले आणि ओ.पी. नय्यर यांची जोडी प्रेक्षकांना भावली. १९६० ते ७० च्या दशकात आशा भोसले यांनी अभिनेत्री हेलन यांना आवाज देत बॉलीवुडवर राज्य केले. वयाच्या ९० व्या वर्षीदेखील तितकाच्या ताकदीने गायन करणाऱ्या आशा भोसले यांच्या जाण्याने सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## वयाच्या नवव्या वर्षी वडील गमावले

आशा भोसले या प्रसिद्ध रंगभूमी अभिनेत्री आणि शास्त्रीय गायिका दीनानाथ मंगेशकर यांच्या कन्या आणि सुरांची राणी लता मंगेशकर यांची धाकटी बहीण होत्या. त्या फक्त नऊ वर्षांच्या असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले, ज्यामुळे त्यांनी त्यांची बहीण लता मंगेशकर यांच्यासोबत कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी गाणे सुरू केले. आशा यांची खासियत म्हणजे त्यांनी प्रत्येक प्रकारच्या गाण्याशी स्वतःला जुळवून घेतले. मग ती रोमँटिक गाणी असोत, कॅबरे गाणी असोत, गझल असोत किंवा शास्त्रीय संगीत असो. त्यांनी प्रत्येक शैलीत त्यांच्या आवाजाची अमिट छाप सोडली.

**14 भाषांमधून**

**12,000 गाणी**

आशा भोसले यांनी चित्रपट संगीत, पॉप, गझल, भजन, शास्त्रीय संगीत अशा विविध प्रकारांमध्ये मराठी, हिंदी, बंगाली, इंग्रजी, तमिळ अशा १४ हून अधिक भाषांमध्ये १२,००० हून अधिक गाणी गायली आहेत.

> आशाताईंच्या निधनाने मला तीव्र दुःख झाले आहे. त्यांनी आपल्या विलक्षण संगीत प्रवासाने भारताचा सांस्कृतिक वारसा समृद्ध केला आणि जगभरातील असंख्य हृदयांना स्पर्श केला. आशाताईंसोबचे माझे संवाद मी नेहमीच जपून ठेवीन. त्यांचे संगीत अमर राहील. ही देशासाठी मोठी हानी आहे. त्यांच्या कुटुंबियांना आणि चाहत्यांना या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो.
> – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> तीन वर्षांपूर्वी धडाक्यात नव्वदी साजरी करणाऱ्या ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशाताई भोसले यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांच्या निधनाने मंगेशकर घराण्यातील लतादीदींनंतर आणखी एक तारा निखळला आहे. सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली. आशाताईंचा आवाज म्हणजे संगीताचा आत्मा होता. गायनातील बारमाही ऋतू आणि भावभावनांचा सुरेल असा म्हणजे आशाताई.
> – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

## जीवनपरिचय

### ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत जन्म

- १९४३ : माझा बाळ या चित्रपटातून १० व्या वर्षी चला चला नवबाला हे पहिले गाणे गायले.
- १९४८ : हिंदीत पहिल्यांदाच चुनरिया या चित्रपटात सावन आया रे हे पहिले गाणे गायले.
- १९८१, १९८६ : राष्ट्रीय फिल्म पुरस्कार (सर्वश्रेष्ठ महिला प्लेबॅक गायिका)
- फिल्मफेयर पुरस्कार : (सर्वश्रेष्ठ महिला प्लेबॅक गायिका) १९६८, १९६९, १९७२, १९७३, १९७४, १९७५ आणि १९७९ मध्ये गौरविण्यात आले आहे.
- १९८७ : नाइटिंगेल ऑफ एशिया अवॉर्डने सन्मान.
- १९९६ : जॅकी श्रॉफ आणि उर्मिला मांतोडकर यांच्या ''रंगीला'' या सिनेमासाठी फिल्मफेयर स्पेशल अवॉर्डने सन्मान.
- १९९७ : ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकित झालेल्या पहिल्या भारतीय गायिका.
- २००० : चित्रपट क्षेत्रातील सर्वश्रेष्ठ दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित.
- २००० : सिंगर ऑफ द मिलेनियम (दुबई)
- २००१ : फिल्मफेयर लाइफटाइम अचिवमेंट अवॉर्ड.
- २००२ : ''लगान''मधील ''राधा कैसे न जले'' या गाण्यासाठी सन्मानित.
- २००८ : भारत सरकारकडून पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित.
- २०११ : गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद.
- २०२३ : राज्य सरकारकडून २४ मार्च २०२३ रोजी महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मान.

# मटक्याचे साम्राज्य उद्ध्वस्त!

## १८.६० लाखांचा मुद्देमाल जप्त; मटका किंग पांडू म्हात्रेसह १४ जणांवर गुन्हा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

बंदी असतानाही बिनधास्तपणे सुरू असलेल्या मटका जुगाराच्या अड्ड्यावर रायगड पोलिसांनी मोठा हात घातला असून, शिरवली येथे टाकलेल्या धाडीत तब्बल १८ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त करत मटका किंगसह १४ जणांना गजाआड केले आहे. जिल्ह्यातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.

मटका जुगारासह अवैध धंदे चालवणाऱ्यास बंदी असतानाही शिरवली मध्ये एका घरात राजरोसपणे मटका जुगार चालविला जात होता. रायगड पोलिसांनी शनिवारी (दि.११) रात्री छापा टाकून मटका माफियांना गजाआड केले. १८



लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यात चारचाकी, दुचाकी वाहनांसह मटका जुगाराच्या साहित्यांचा समावेश असून मटका किंग पांडूरंग म्हात्रे यांच्यासह १४ जणांविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. •> पान २ वर

### जुगार खेळणाऱ्या तिघांवर गुन्हा

**पनवेल** : मटका जुगारावर कारवाई करत खारघर पोलिसांनी अक्षय अशोक वाघमारे (पापडीचा पाडा, सेक्टर ३९), दिगंबर गडंबे (पापडीचा पाडा), अंकुश विजय जाधव (पापडीचा पाडा, सेक्टर ३९) यांच्या विरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पापडीचा पाडा, सेक्टर ३९ या ठिकाणी मटका जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार छापा टाकून तिघांना ताब्यात घेतले. त्या ठिकाणाहून एक मोबाइल आणि रोख रक्कम ताब्यात घेतली.

# शेतजमिनीच्या वादातून महिलेवर कोयत्याने हल्ला

## पितापुत्राविरोधात गुन्हा दाखल

| नागोठणे | प्रतिनिधी |

वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वादावरून कोयत्याने वार करून झालेल्या हल्ल्यात एक ४७ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली आहे. ही घटना नागोठण्याजवळील शिहू (ता. पेण) गावात शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सायंकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी शिहू गावातील पिता-पुत्रावर नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, या घटनेतील आरोपी क्रमांक १ द्वारकानाथ काशिनाथ म्हात्रे (रा. शिहू, ता. पेण) यांची आई मुक्ताबाई म्हात्रे यांनी या घटनेतील जखमी फिर्यादी भारती यशवंत म्हात्रे, ४७ (रा. शिहू, ता. पेण) यांना शनिवारी (दि.११) सायंकाळी शिवीगाळ केली. त्यानंतर द्वारकानाथ म्हात्रे याने हातात कोयता घेऊन जखमी फिर्यादी भारती म्हात्रे यांच्या घरात घुसून गळा डाव्या हाताने धरला आणि उजव्या हातात आणलेल्या कोयत्याने त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर वार केला. त्यामुळे फिर्यादी भारती म्हात्रे यांच्या मनगटाला दुखापत होऊन त्या गंभीर जखमी झाल्या. •> पान २ वर

# उरणमध्ये ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यात वाढत्या नशेच्या बाजारावर पोलिसांनी जोरदार कारवाई करत जासई येथे छापा टाकून तब्बल २.५ लाखांचे हेरॉईन जप्त केले. या प्रकरणात तीन जणांना अटक करण्यात आली असून, नशेच्या विळख्यात अडकत चाललेल्या तरुणाईमुळे गंभीर सामाजिक संकट उभे राहिल्याचे चित्र समोर आले आहे.

उरण तालुक्यात चरस, गांजा व इतर अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, अनेक ठिकाणी खुलेआम नशेचा बाजार सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. या अमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीचा फटका सर्वाधिक शाळा व महाविद्यालयातील



- ■ २.५ लाखांचे हेरॉईन जप्त
- ■ तीन तरुणांना पोलिसांकडून अटक

तरुणांना बसत असून, तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत आहे. त्यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, नशेच्या आहारी गेलेले अनेक जण पुढे गुन्हेगारीकडे वळत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर उरण पोलिसांनी अमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेदरम्यान शुक्रवारी दुपारी जासई येथील पार्किंग परिसरात छापा टाकून अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या एका तरुणासह त्याचे सेवन करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईत २ लाख ५२ हजार ८०० रुपये किमतीचे हेरॉईन जप्त करण्यात आले.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, जासई येथील शीतल परिवहन पार्किंगच्या मागे जांभळाच्या झाडाखाली काही तरुण संशयास्पदरीत्या अमली पदार्थांचे सेवन करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार १० एप्रिल रोजी दुपारी सुमारे २ •> पान २ वर

## पनवेलमध्ये कोकण विभागीय परिषद उत्साहात | खा. सुरेश म्हात्रेंची प्रमुख उपस्थिती

# सत्यशोधक विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड जिल्ह्यातर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त पनवेल येथे आयोजित कोकण विभागीय सत्यशोधक परिषद रविवारी (दि. १२) उत्साहात पार पडली. या परिषदेत प्रमुख पाहुणे खासदार सुरेश गोपीनाथ म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना त्यांनी महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच दि.बा. पाटील यांच्या कार्याची प्रेरणा घेत, चांगल्या गोष्टी आत्मसात करून




वाईट प्रवृत्ती दूर करत सत्यशोधक विचारसरणी समाजात रुजवण्याची गरज अधोरेखित केली.

परिषदेच्या उद्घाटक म्हणून उपस्थित असलेल्या सुरेखा दळवी यांनी आदिवासी व कष्टकरी समाजाच्या न्यायासाठीच्या आपल्या लढ्याचा उल्लेख करत, हा लढा म्हणजे सत्यशोधनाचा प्रवासच असल्याचे सांगितले. व्यापक परिवर्तनाच्या चळवळीत आपण जबाबदार वारसदार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

उद्घाटन सत्राचे अध्यक्ष उत्तम जोगदंड, महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, राज्य सरचिटणीस आरती नाईक यांच्यासह कार्यकर्त्यांच्या हस्ते नावीन्यपूर्ण पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. महापुरुषांच्या पुस्तकांची प्रतिकात्मक रचना करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी उत्तम जोगदंड यांनी फेक न्यूजच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करत, सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून 'फॅक्ट चेक'चे महत्त्व आजही तितकेच अधोरेखित होत असल्याचे सांगितले. उपस्थितांनी सत्यशोधक विचारांवरील कला प्रदर्शनालाही •> पान २ वर


### दिबांचे नाव द्या!

परिषदेतील दुसऱ्या सत्रात 'ज्योतिबा ते दि.बा. पाटील वारसा सत्यशोधनाचा' या विषयावर परिसंवाद झाला. यामध्ये वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर व शिवराज्य प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रोशन पाटील यांनी मराठी शाळा वाचवण्याचा लढा हा महात्मा ज्योतिबा फुले यांना खरी आदरांजली असल्याचे मत ठामपणे मांडले. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

# शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिनानाथ पाटील यांचे निधन

| अलिबाग | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिनानाथ मसणाजी पाटील (दिना गुरुजी) यांचे शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते अलिबाग तालुक्यातील बहिरीचापाडा येथील रहिवासी होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पाटील कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



कै. दिना गुरुजी यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून पोलादपूर व श्रीवर्धन तालुक्यांत प्रामाणिकपणे सेवा बजावली. त्यानंतर अलिबाग तालुक्यातील बहिरीचापाडा व वाघ्रण येथे मुख्याध्यापक म्हणून कार्य करत त्यांनी निवृत्ती स्वीकारली. शिक्षण क्षेत्रात काम करत असतानाच त्यांनी शेतकरी कामगार पक्षात सक्रिय भूमिका बजावत पक्षविस्तारासाठी योगदान दिले. प्रभाकर पाटील (भाऊ) यांच्यासह पवारशेठ व शं. भि. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पक्षाचे कार्य जोमाने केले. धार्मिक व सामाजिक कार्यातही त्यांचा मोठा सहभाग होता. ते श्री विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. भजन मंडळ, एकादशी हरिनाम सप्ताह यांसारख्या धार्मिक उपक्रमांत ते सातत्याने सहभागी होत असत.

त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, पाच भाऊ, •> पान २ वर

# औषधांचा तुटवडा, रुग्णांची हेळसांड

## • खालापूर आरोग्य केंद्राचा ढिसाळ कारभार

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूर तालुका हा मुंबई आणि पुणे या दोन महानगरांच्या मध्यवर्ती ठिकाण असल्याने हा तालुका नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने जिल्ह्यात चर्चेत असतो. त्यातच या तालुक्याचा मुख्य असलेला प्राथमिक आरोग्य केंद्र हा अनेक गोरगरीब जनतेला आधार ठरत असताना आताच्या घडीला या आरोग्य केंद्रात रूग्णांची अपुऱ्या औषधांमुळे मोठी हेळसांड होत असल्याने येथील आरोग्य विभागाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

खालापूर तालुक्यात अनेक शासकीय यंत्रणेबाबत तीव्र नाराजी काही ठिकाणी होत असताना त्यातच आता खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील यंत्रणेबाबत अनेकजण नाराजी व्यक्त करत असून, यामध्ये अपुऱ्या औषधांच्या तुटवण्यामुळे येथील येणाऱ्या रुग्णांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. याठिकाणी औषधांचा तुटवडा भासत असल्याने अनेक रुग्णांना उपचाराविना घरी माघारी जावे लागते. तर काहीजण बाहेरील खासगी मेडिकलमधून महागडी औषधे खरेदी करत आपल्यावर उपचार घेत असल्याचे पहावयास मिळत आहे.

खालापूर तालुक्यातील जुना मुंबई-पुणे हायवे व त्याचबरोबर मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे गेल्याने या ठिकाणाला महाराष्ट्र राज्यात वेगळेच नाव प्राप्त झाले असून, याठिकाणी मोठ्या प्रमाणात आदिवासी-ठाकूर समाज वास्तव्यास असल्याने या समाजाबरोबर अनेक गोरगरिबांना उपचारासाठी सरकारची आरोग्य यंत्रणा कामास येत असते. त्यामुळे अनेक जण शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेत आपल्या जीवनात पुढील वाटचाल करत असताना आजच्या महागड्या युगात अनेकांना खाजगी रुणालयात उपचार घेणे शक्य नसल्याने बहुतांश नागरिक प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य केंद्र जात उपचार घेत आपल्या शरीरावर निदान करत असतात. त्यामुळे अनेक गोरगरीब जनतेला सरकारचे प्राथमिक आरोग्य केंद्र आधारवड ठरत असताना खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात जात अनेकांनी उपचार घेतले असता आत्ताच्या घडीला या आरोग्य केंद्रात शासनाच्या औषधांच्या तुटवडा भासत असल्याने या ठिकाणी जाणाऱ्या रुग्णाला उपचाराविना माघारी घरी परतावे लागत असल्याने उपचार घेण्यासाठी काहीजण खिशाला कात्री लावत खासगी रुणालयात उपचार घेतात. त्यामुळे येथील आरोग्य यंत्रणा सध्याच्या घडीला रामभरोशी बनल्याने येथील आरोग्य यंत्रणेच्या कारभाराबाबत जनता नाराजी व्यक्त करत आहेत.

> “खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची संख्या अधिकच आहे ११ मार्च २०२६ ला औषध पुरवठा व्हावा यासाठी ९५ प्रकारची औषधे मिळावीत अशी मागणी केली होती. मात्र, ६९ प्रकारची औषधे उपलब्ध झाल्यामुळे, रुग्णांना उपलब्ध असणारी औषधे दिली जातात आणि काही औषधे खासगी मेडिकलमधून घेण्याच्या लिहून दिली जातात. पुरेसा औषध पुरवठा व्हावा, अशी मागणी सातत्याने प्रशासनाकडे करीत असतो.
> – अनिल कुमार शाह, वैद्यकीय अधिकारी, खालापूर आरोग्य केंद्र”

> “खालापूर तालुका प्राथमिक आरोग्य केंद्र हा आदिवासी, ठाकूर समाजातील जनतेसह गोरगरीब नागरिकांना मोठा दिलासा देत असताना आता या आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना औषधांची कमतरता भासत असल्याने उपचाराविना परत जावे लागते. तर काहींना खासगी मेडिकलमधून औषध विकत घेत उपचार घ्यावे लागत आहे, त्यामुळे येथील आरोग्य यंत्रणा ही औषधांच्या तुटवड्यामुळे रामभरोसे झाली आहे. तर येथील ही औषधांच्या तुटवड्ययाची समस्या दूर करण्यासाठी जिल्हा स्तरावर पावले उचलावी. नाहीतर गोरगरीब रुग्णांना मोठा भुर्दंड सोसावे लागेल किंवा मोठ्या आजाराला सामोरे जावे लागेल.
> – अनिल पिंगळे, सामाजिक कार्यकर्ते”

## बेलोशीतील इसमाला लाखोंचा गंडा

### ऑनलाईन व्यवसायाच्या आमिषाने ६.१६ लाखांची फसवणूक

| रेवंदडा | प्रतिनिधी |

सोशल मीडियावरून मैत्री करून मोठ्या नफ्याचे आमिष दाखवत बेलोशी येथील एका व्यक्तीची तब्बल ६ लाखांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, रेवदंडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलिबाग तालुक्यातील बेलोशी येथील ४७ वर्षीय परेश गुंड यांची फेसबुक व व्हॉट्सॲपच्या माध्यमातून ओळख करून घेत अज्ञात महिलेने त्यांना ऑनलाईन व्यवसायातून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल रुपये ६,१६,११३.४० इतकी रक्कम उकळल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २९ मार्च ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत संबंधित महिलेने फेसबुकवर मैत्री करून पुढे व्हॉट्सॲप चॅटिंग व व्हॉईस कॉलद्वारे विश्वास संपादन केला. त्यानंतर व्यवसायात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल असे सांगत तिने एका मोबाईल लिंकद्वारे व्यवहार करण्यास भाग पाडले. सदर लिंकच्या माध्यमातून यूपीआयद्वारे टप्प्या-टप्प्याने एकूण ६,१६,११३.४० इतकी रक्कम काढून घेण्यात आली. नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच परेश गुंड यांनी तात्काळ रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे करीत आहेत.

दरम्यान, सोशल मीडियावरून येणाऱ्या अशा आकर्षक गुंतवणूक योजनांपासून नागरिकांनी सावध राहावे, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि आर्थिक व्यवहार करताना योग्य पडताळणी करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## महिलेची हत्या; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील वाकडी ते चिंचवलीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या आतमध्ये एका महिलेचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत सापडला आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

११ एप्रिल रोजी वाकडी ते चिंचवली गावाच्या हद्दीत वनविभागाच्या जागेत एका महिलेचा मृतदेह जळालेला अवस्थेत असल्याची माहिती तालुका पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पनवेलचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे यांनीदेखील रात्रीच्या वेळेस घटनास्थळी जाऊन पाहणी केली. फॉरेन्सिक व्हॅन देखील घटनास्थळी दाखल झाली. यावेळी मुख्य रस्त्यापासून जवळपास दीडशे ते दोनशे फूट अंतरावर वनविभागाच्या जागेत एका महिलेचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत दिसून आला. या महिलेची ओळख पटलेली नाही.

## पती-पत्नीला २० वर्षांची शिक्षा

### एकाच गुन्ह्यातील ऐतिहासिक निकाल

| पनवेल | प्रतिनिधी |

अल्पवयीन मुलींना वेश्या व्यवसायात ढकलून लैंगिक शोषण केल्याच्या गंभीर प्रकरणात न्यायालयाने पती-पत्नीला तब्बल २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावत कडक संदेश दिला आहे. पोक्सो आणि पिटा कायद्यांतर्गत एकाच गुन्ह्यात दोघांनाही शिक्षा झाल्याची ही दुर्मिळ आणि ऐतिहासिक घटना मानली जात आहे. आश्रित म्हणून राहणाऱ्या दोन बहिणींना, त्यातील एक अल्पवयीन असताना, जबरदस्तीने वेश्या व्यवसायात ढकलून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या राजेश सोनाजी शिंदे (४२) व त्याची पत्नी शुभांगी सोनाजी शिंदे (३७) या दांपत्याला न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावास आणि ३३ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास सहा महिन्यांचा अतिरिक्त सश्रम कारावास भोगावा लागणार आहे.

२०१९ मध्ये रबाळे पोलीस ठाणे हद्दीत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाने कारवाई करत दोन मुलींची सुटका केली होती. सुटका करण्यात आलेल्या मुलींनी दिलेल्या माहितीनुसार, त्या सख्ख्या बहिणी असून त्यातील एक अल्पवयीन होती. आई-वडिलांच्या निधनानंतर त्या आपल्या नातेवाईक असलेल्या शिंदे दांपत्याकडे राहात होत्या. शिक्षण घेण्याच्या वयात असतानाच या दोघींना जबरदस्तीने वेश्या व्यवसायात ढकलण्यात आले होते. विशेषतः अल्पवयीन मुलीकडूनही हा प्रकार करवून घेतल्याचे उघड झाले होते.

याप्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम ३७० (लैंगिक शोषण), तसेच पोक्सो कायद्यांतर्गत कलम ४, ६, १७ आणि वेश्या व्यवसायास भाग पाडण्यासंदर्भातील पिटा कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता. आरोपी राजेश शिंदे याला तळोजा कारागृहात, तर शुभांगी शिंदे हिला ठाणे कारागृहात ठेवण्यात आले होते. या प्रकरणाचा खटला बेलापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय (क्रमांक २) येथे न्यायाधीश मांडवगडे यांच्या न्यायासनासमोर चालू होता.

## अपघातग्रस्त महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगावमध्ये झालेल्या दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. दि. ११ मार्च २०२६ रोजी दुपारी एक वाजता उपजिल्हा रुग्णालयासमोर स्कुटी घसरून झालेल्या अपघातात रेबिना सलीम माटवणकर (५०) गंभीर जखमी झाल्या. डोक्याला, कंबरेला व पाठीच्या मणक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना नवी मुंबई येथील एम.जी.एम. रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तपास सुरू आहे. रस्ते अपघातांच्या वाढत्या घटनांमुळे चिंतेचे वातावरण आहे.

## श्रीवर्धनमध्ये घोडागाडीची चोरी

**श्रीवर्धन :** श्रीवर्धनमध्ये भरदिवसा मैदानावर उभी असलेली घोडागाडी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. ०९ एप्रिल रोजी रात्री आठ ते दि. १० एप्रिल रोजी रात्री आठ या कालावधीत रा.ना. राऊत शाळेच्या मागील मैदानावरून फिर्यादी रा. मेटकर्णी यांच्या मालकीची सुमारे ३०,५०० रुपये किमतीची घोडागाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

# महिला अत्याचाराच्या घटना न शोभणाऱ्या

## खा. सुप्रिया सुळे यांचा सरकारवर आसूड

| मुंबई | प्रतिनिधी |

पुणे येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त अभिवादन केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी विविध प्रश्नांवर आपले मत मांडताना सरकारला धारेवर धरत आसूड ओढले. पत्रकारांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या अंधश्रद्धा, महिला अत्याचार, हुंडाबळी यांसारख्या घटना वारंवार घडत आहेत, हे शिव, फुले, शाहू, डॉ. आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे नाही. मुलींच्या शिक्षणाबाबत असरच्या अहवालातून मिळणारी माहिती समाधानकारक नाही. त्यामुळे या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन महाराष्ट्र सरकारने हे वर्ष सामाजिक परिवर्तनासाठी आणि महिला अत्याचार व मुलींच्या शिक्षणासाठी द्यावं, असे सुप्रिया सुळे यांनी पुणे येथे पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.

सर्वांनी मिळून सामाजिक परिवर्तनासाठी काम करण्याची गरज आहे. अशोक खरात प्रकरणात पीडित महिलांना धमक्या मिळत असताना, त्यांपैकी एकाही महिलेला तक्रार करण्याचा आत्मविश्वास समाज म्हणून आपण का देऊ शकलो नाही. एक यंत्रणा आणि व्यवस्था म्हणून आपण अपयशी ठरलो आहोत का? असा खोचक प्रश्न करत या सर्व प्रश्नांचा आणि घटनांचा गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे, असेही सुळे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

महाराष्ट्र सरकारने हे वर्ष सामाजिक परिवर्तनासाठी महिला अत्याचार आणि मुलींच्या शिक्षणासाठी द्यावं, असे खा. सुळे म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आणि युवती काँग्रेसने ठरवले आहे की, ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये महिला अत्याचाराच्या घटना घडतील, त्या ठिकाणी पोलीस अधीक्षकांना भेटून भोंदूबाबांकडून होणाऱ्या महिलांवरील अत्याचार आणि छळाविरोधात आवाज उठवला जाईल आणि तो थांबवण्यासाठी राज्यभर मोहीम राबवली जाईल.

अजित पवार यांच्या दुर्घटनेबाबत रोहित पवार सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहे. मात्र, त्यावर कारवाई का केली जात नाही? या दुर्घटनेमागील कारण काय? यासंदर्भात उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत, एवढीच आमची अपेक्षा आहे, अशी सुप्रिया सुळे यांनी मागणी केली आहे.

पान १ वरून

## सप्तसुरांची सम्राज्ञी हरपली!

आशा भोसले यांनी १९४८ साली आशा भोसले यांनी चुनरिया चित्रपटाद्वारे पार्श्वगायक क्षेत्रात त्यांनी पदार्पण केले. त्यांनी १२ हजार हून अधिक गाणी गाण्याचा विक्रम नोंदवला आहे. ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत जन्मलेल्या आशा भोसले यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील संगीताला वेगळ्या उंचीवर नेले. त्यांनी ७ दशकांहून अधिक काळ मराठी, हिंदीसह अनेक भाषांत हजारो गाणी गायली आहेत. आशा भोसले यांना २००८ साली पद्मविभूषण, २००० साली दादासाहेब फाळके पुरस्कार यांसारख्या सर्वोच्च नागरी सन्मानांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. त्यांच्या अष्टपैलू गायकीने बॉलिवूडमध्ये महिला अभिव्यक्ती पुन्हा परिभाषित केली.

## शेतजमिनीच्या वादातून महिलेवर कोयत्याने हल्ला

त्यानंतरही आरोपी द्वारकानाथ म्हात्रे व त्यांचा मुलगा विशाल म्हात्रे यांनी फिर्यादी भारती म्हात्रे यांना शिवीगाळ करून हाताबुक्क्याने मारहाण केली.

याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासकीय अधिकारी पोलीस उपनिरीक्षक गोटीराम पावरा हे पुढील तपास करीत आहेत.

## उरणमध्ये ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

वाजता छापा टाकण्यात आला. यावेळी रवींद्र कल्याण शेट्टी (२७), गणेश दत्तू भिडे (२५) व गणेश विनय पाटील (१९) हे तिघेही अमली पदार्थाचे सेवन करताना आढळून आले.

झडतीदरम्यान गणेश पाटील याच्याकडे ६.३२ ग्रॅम वजनाच्या हेरॉईनच्या ८५ पुड्या सापडल्या. या अमली पदार्थाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत अंदाजे २,५२,८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. तिघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांनी दिली.

दरम्यान, उरणमध्ये मोठ्या प्रमाणात नशेच्या पदार्थांची विक्री सुरू असल्याने अशा प्रकारच्या बेकायदेशीर धंद्यांवर तातडीने आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी विविध सामाजिक संस्था व संघटनांकडून प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

## शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिनानाथ पाटील यांचे निधन

एक बहीण, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा मोठा मुलगा डॉ. मनोज पाटील हे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असून, दुसरे पुत्र प्रेमानंद पाटील वायरमन आहेत, तर तिसरे पुत्र केशव पाटील हे पवन हाऊस (हेलिकॉप्टर) सेवेत कार्यरत आहेत. त्यांच्या कुटुंबियांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

कै. दिनानाथ पाटील यांच्या निधनानंतर बहिरीचापाडा व परिसरात शोककळा पसरली असून, विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. त्यांचा तेरावा विधी शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी विठ्ठल मंदिर, बहिरीचापाडा येथे त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

## मटक्याचे साम्राज्य उद्ध्वस्त!

यामध्ये आणखी ८० जणांचा समावेश असल्याची माहिती सूत्रांकडून उपलब्ध झाली आहे. मटका जुगाराची जिल्ह्यातील सर्वात मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग-रेवस मार्गावरील शिरवली येथे जिम्मी होम नावाचे घर आहे. या अलिशान घरात खुलेआमपणे ‘कल्याण मेन’ नावाचा मटका जुगार चालवला जात होता. ही माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला मिळाली. शनिवारी (दि.११) रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास पथकाने छापा टाकला. या छाप्यात मटका जुगार चालवण्यासाठी लागणारे साहित्य व काही मंडळी दिसून आली. या सर्वांना ताब्यात घेऊन १८ लाख ६० हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पांडुरंग म्हात्रे, आचल कडवे, जितेंद्र पाटील, राहुल पाटील, जयेश कडवे, विनायक अंबाडे, केतन पाटील, रितेश कडवे, रोशन म्हात्रे, रविंद्र पाटील, अंश पाटील, प्रज्वल पाटील, अलंकार पाटील, अक्षय पाटील या चौदा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ‘कल्याण मेन’ नावाचा मटका जुगारचा धंदा अलिबाग तालुका व परिसरात बेकायदेशीर चालवून ऑनलाईन आणि रोखीत पैसे प्राप्त केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याबाबत पोलीस हवालदार अमोल हंबीर यांनी फिर्याद नोंदवली आहे.

पांडुरंग म्हात्रे हा मटका किंग म्हणून ओळखला जात असून, त्याच्याविरोधात यापूर्वी मटका जुगार प्रकरणी अलिबाग, पोयनाड या पोलीस ठाण्यात एकूण नऊ गुन्हे दाखल असून, अलंकार पाटील यांच्या विरोधात २०२४ मध्ये गुन्हा दाखल असल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात आली आहे.

## सत्यशोधक विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन

मोठी दाद दिली. परिषदेतील दुसऱ्या सत्रात ‘ज्योतिबा ते दि.बा. पाटील वारसा सत्यशोधनाचा’ या विषयावर परिसंवाद झाला. यामध्ये वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर व शिवराज्य प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रोशन पाटील यांनी मराठी शाळा वाचवण्याचा लढा हा महात्मा ज्योतिबा फुले यांना खरी आदरांजली असल्याचे मत ठामपणे मांडले.

ज्येष्ठ पत्रकार दिपक म्हात्रे यांनी दि.बा. पाटील यांच्या वैचारिक भूमिकेवर प्रकाश टाकला, तर शेतकरी कामगार पक्षाचे नेते अतुल म्हात्रे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उद्भवणाऱ्या समस्यांवर सत्यशोधक विचार हा उपाय ठरू शकतो, असे प्रतिपादन केले.

परिषदेची सांगता शिक्षण, धर्म, विवाह व लैंगिकतेविषयक कायद्यांबाबत ठराव मांडून करण्यात आली. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे जांभुळपाडा ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन गावठाणातील मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांव | गट/स.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. गोविंद विठ्ठल दळवी. | ३३/१ | ०-२०-०० | १-०८ |
| श्री. लक्ष्मण विठ्ठल दळवी. | ३३/१ | ०-२०-०० | १-०८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १३/०४/२०२६

खरेदीदारांचे लेखक,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन, ऑफिस नं. ७ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे मांडला, ता.मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. निलेश गोविंद थळे रा. १०६/ए-विंग, गौरी वैकुंठ व्हिला को.ऑप. हौसींग सोसायटी, सुभाष रोड, चिंचोली पाडा, डोंबिवली -पश्चिम, कल्याण, ठाणे, विष्णुनगर, महाराष्ट्र यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झाला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग क्र. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| मांडला | १९१/१/१ | | ०-३३-४० | ०.३४ |
| ता. मुरुड | | पो.ख. | ०-०७-६० | |
| | | एकूण | ०-४१-०० | |

वर नमूद मिळकतीपैकी श्री. निलेश गोविंद थळे यांचे मालकीच्या गट क्र. १९१/१/१, क्षेत्र ०-१६-८० हे. आर., पो.ख. ०-०४-२० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२१-० हे.आर., आकार रु. ०.१८ पेसे ही मिळकत व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड येथील मालमत्ता क्र. ५१६, क्षेत्र ४३२.९६ चौ. फूट (४०.२३ चौ.मी.) या जोता मिळकतीबाबत

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०४/२०२६

सही/-
**ॲड. नितीन हरिश्चंद्र पाटील**
रा. उत्कर्ष बंगला, श्रीबाग नं. २, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९४२२६९०८४२

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my Clients have entered into negotiations with one of the legal heir i.e. Mr. Sadanand Tukaram Bailmare of Late Mr. Tukaram Sakharam Bailmare who was the sole owner of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and is proposing to purchase/acquire all the rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice :-

All persons / entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/ or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owner in/to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlement or under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owner or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the agricultural land admeasuring 33 Ares 85 Square Metres, approximately admeasuring 3,385 Square Metres. Assessing to Rs.0.22 Paise, being part and parcel of land bearing Survey No. 10 Hissa1/A admeasuring in aggregate 67 Ares 70 Square Metres, approximately admeasuring 6,770 Square Metres Assessed to Rs.0.45 Paise, being, lying and situated at Village Savroli, Taluka Khalapur and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402 201.

## निवडक



● (छायाचित्र : उदय कळस)

### कुडतुडी जलजीवन मिशनचे उद्घाटन

**म्हसळा :** कुडतुडी ग्रामसुधारणा मंडळ मुंबई आणि स्थानिक व महिला मंडळ यांच्या विद्यमाने म्हसळा तालुक्यातील कुडतुडी येथील जलजीवन योजनेच्या कामाचे उदघाटन राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी सभापती बबन मनवे, तालुका प्रमुख समीर बनकर, पं.स. सदस्य लहू म्हात्रे, पं.स. सदस्या समृद्धी चाचले, पं.स. सदस्या प्रियांका निंबरे, निवासी नायब तहसीलदार चंद्रशेखर खोत, गटविकास अधिकारी माधव जाधव, या योजनेला विनामूल्य जागा देणारे दानशूर ग्रामस्थ मोहन चाळके, मुंबई मंडळ अध्यक्ष मंगेश चाळके, सरचिटणीस राजेश चाळके, खजिनदार सुरेंद्र चाळके, उपाध्यक्ष संदिप चाळके, उत्सव अध्यक्ष संतोष चाळके, कार्याध्यक्ष नितीन दळवी, स्थानिक अध्यक्ष नथुराम चाळके, गावसरचिटणीस विजय चाळके, गाव खजिनदार सुधाकर चाळके, पाणी कमिटी अध्यक्ष वसंत चाळके, स्थानिक कार्याध्यक्ष द्वारकानाथ दळवी, प्रदीप कदम,सरचिटणीस ग्रामसुधारणा मंडळ मुंबई राजेश चाळके, ग्रामस्थ, महिला आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा. गंगोत्री यादव यांना पीएचडी

**नवीन पनवेल :** डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी



ॲण्ड रिसर्च सेंटर, पनवेल येथील प्रा. डॉ. गंगोत्री यादव यांना मुंबई विद्यापीठाकडून विज्ञान व तंत्रज्ञान पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी आपले डॉक्टरेट संशोधन विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ फार्मसी, चेंबूर येथे डॉ. गंगा श्रीनिवासन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. आपल्या पीएचडी. प्रवासादरम्यान डॉ. यादव यांनी उल्लेखनीय शैक्षणिक यश संपादन केले, ज्यामध्ये २ पेटंट्सचे प्रकाशन, विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये ३ संशोधन पोस्टर्सचे सादरीकरण या गोष्टींचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष धनराज विसपुते, सचिव संगीता विसपुते आणि प्राचार्य डॉ. आशिष जैन तसेच संपूर्ण शैक्षणिक परिवाराने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. ही कामगिरी संस्थेच्या मजबूत संशोधन संस्कृती आणि शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.



### खरवई शाळेतील विद्यार्थ्यांची चिंता मिटली

**चिरनेर :** खालापूर तालुक्यातील स्व. मॉंसाहेब मीनाताई ठाकरे माध्यमिक विद्यालय खरवई ही आदिवासी विभागामधील शाळा आहे. विद्यालयातील मुलींसाठी व मुलांसाठी शौचालयाची मोठी गरज होती. याबाबत विद्यालयाचे किशोर सणस यांनी परशुराम माळी यांना शौचालयाबाबत विनंती केली असता परशुराम माळी यांनी त्यांचे सहकारी पवार यांच्या पुढाकाराने या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विद्यालयास एक सुसज्ज असे शौचालय बांधून दिले आहे. या शौचालयाचे उद्घाटन संस्थेच्या मॅनेजर दीप्ती हजारे व परशुराम माळी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी संस्थेचे सुरज सर, पवार सर, सचिन बांधल विद्यालयाचे मुख्याध्यापक हिंगडे, दावभट सणस, खोपडे, घोसाळकर मॅडम, सुरवसे मॅडम, चौधरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील शिक्षकांनी मनोगतातून आमची शौचालयाची सर्वात मोठी समस्या दूर झाल्याने मुख्याध्यापक यांनी माळी व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

### ट्रेलरमधून डिझेलची चोरी

**पनवेल :** उभ्या असलेल्या ट्रेलरच्या डिझेल टाकीचे कुलुप तोडुन अज्ञात चोरट्यानी डिझेलची चोरी केल्याची घटना तालुक्यातील साईबाबा ढाबा, बोरले गांव येथे घडली आहे. मोहम्मद लतिफ मोहम्मद हालीम (वय ३८) यांनी त्यांच्या ताब्यातील ट्रेलर हा ज्योती ट्रान्सपोर्ट गैरेज, साईबाबा ढाबा, बोरले गांव येथे उभा ठेवला असता अज्ञात दोन इसमांनी तेथे त्याच्या ताब्यातील गाडी आणून ट्रेलरच्या डिझेल टाकीचे कुलुप तोडुन २६,४१६ रुपये किमतीचे एकूण २९० लिटर डिझेल चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# आर्डे गावामध्ये दिवसाआड पाणी

- किमान अर्धा तास पाणी सोडण्याची महिलांची मागणी
- फेब्रुवारी-मार्चपासून पाण्याची समस्या



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायतीमधील आर्डे गावातील सध्याची नळपाणी योजना बंद पडली आहे. नवीन नळपाणी योजनेचे काम सुरू असून गेली तीन वर्षे सुरू आहे. त्यामुळे आर्डे पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. ग्रामस्थांना ग्रामपंचायतीकडून पाषाणे धरणातून उचलले जाणारे पाणी दिवसाआड सोडले जात आहे. मात्र, ते पाणी दररोज मिळावे आणि सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसात किमान अर्धा तास पाणी मिळावे अशी मागणी महिलांनी केली आहे.

आर्डे गावातील नळपाणी योजनेचे विहीर ही उन्हाळ्यात कोरडी होत असल्याने या ठिकाणी फेब्रुवारी मार्च महिन्यापासून पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते.

गावात असलेल्या विहिरीचे पाणी पिण्यासाठी आणण्यासाठी देखील काही शे मीटर अंतर पायपीट येथील महिला वर्गाला करावी लागते. मात्र, पिण्याचे पाणी विहिरीवरून घ्यावे लागते, पण जनावरे यांच्यासाठी लागणारे पाणी घरात वापरण्यास लागणारे पाणी यांची सोय नसल्याने पाषाणे ग्रामपंचायतीकडून येथील ग्रामस्थांसाठी पाषाणे लघुपाटबंधारे प्रकल्पातून पाणी पाइप लाईन टाकून आणले आहे. त्या पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायतीकडून दिवसाआड १५ मिनिटे केला जातो. हा पाण्याचा पुरवठा जेमतेम होत असल्याने स्थानिक रहिवाशांना पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

नळपाणी योजनेचे पाणी योजना डिसेंबर ते जानेवारीपर्यंत ही योजना चालू असते. त्यानंतर पाण्याचा तुटवडा या गावांमध्ये जाणवत असतो.

गावाचे लोकसंख्या एकूण १४०० ते १५०० इतकी आहे. परंतु मात्र, या गावाला पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने या गावातील लोकांचे प्रचंड प्रमाणात हाल होताना पाहायला मिळत आहे. घरामध्ये पिण्यायोग्य पाणी आणण्यासाठी गावातील महिलांना पाण्यासाठी वणवण भटकत विहिरीवर जात असतात. मात्र, त्यानंतर जे घरगुती किंवा कपडे धुण्यासाठी पाणी लागते हे पाणी ग्रामपंचायत येथे सोडते. मात्र ते पाणी दिवसाआड सोडले जात असल्याने महिलांची पायपीट कायम आहे.

दिवसाआड केवळ १५ मिनिटे पाणी सोडले जात असल्याने ग्रामस्थ हैराण आहेत. जलजीवन योजनेचे काम अनेक वर्षे रखडले असून ते लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी ग्रामस्थांची असून ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन पाषाणे लघुपाटबंधारे प्रकल्पातून आता दररोज पाणी सोडले जाईल असे आश्वासन ग्रामपंचायत अधिकारी केंद्रे यांनी दिले आहे.

#### नियोजनाचा अभाव

तालुक्यात पुरेसा पाऊस पडूनही योग्य नियोजनाअभावी दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. पावसाचे पाणी थेट समुद्राला जाऊन मिळते. या टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून टंचाई निवारण आराखडा तयार करुन, उपाययोजना करणे गरजेचे आहे.

> **घरात वापरणाऱ्या पाण्याची टंचाई आल्याने या गावातील महिलांना नदीवर कपडे धुण्यासाठी जावे लागत आहे. कपडे धुण्यासाठी तीन ते चार किलोमीटर पायपीट करून पोषण नदीवर जावे लागते. ग्रामपंचायतीने दररोज किमान एक तास पाणी सोडावे अशी ग्रामस्थांची मागणी आहे.**
>
> **-सचिन शेळके, ग्रामस्थ**

# १०८ वर्षांची जिवंत साक्षीदार

**माणगाव पोलीस ठाण्याला ऐतिहासिक वारसा**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहराच्या मध्यभागी उभी असलेली तहसीलदार कार्यालय आणि माणगाव पोलीस ठाण्याची ही ऐतिहासिक इमारत म्हणजे केवळ दगडांची रचना नसून, ती इतिहासाच्या असंख्य आठवणींची जिवंत साक्ष आहे. सन १९१८ मध्ये इंग्रज सत्ताकाळात ब्रिटिश सरकारने उभारलेली ही भव्य इमारत आज तब्बल १०८ वर्षांचा प्रवास पूर्ण करूनही तितक्याच दिमाखात उभी आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात 'न्यू मामलेदार कचेरी' या नावाने ओळखली जाणारी ही वास्तू, त्या काळच्या प्रशासकीय व्यवस्थेचे



केंद्र होती. विशेष म्हणजे, त्या काळी तहसीलदार कार्यालय आणि पोलीस ठाणे एकाच इमारतीत कार्यरत होते.

काळाच्या ओघात जागेची कमतरता भासू लागल्याने तहसीलदार कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात आली, मात्र जुनी इमारत आजही तितक्याच मजबुतीने उभी आहे.

दगडी बांधकामात उभारलेली ही इमारत तिच्या भक्कमपणासाठी आणि अभेद्य रचनेसाठी ओळखली जाते. मोठ्या सळईंचा दरवाजा, मजबूत प्रवेशद्वारे आणि आत असलेले सागवान लाकडाचे खांब-वासे आजही त्या काळच्या कारागिरीची साक्ष देतात. विशेष बाब म्हणजे, या पोलीस ठाण्यातील अभेद्य कोठडीतून आजपर्यंत एकही कैदी पळून जाऊ शकलेला नाही, ही बाब या इमारतीच्या सुरक्षिततेचे प्रतीक आहे. या वास्तूच्या भिंतींनी अनेक ऐतिहासिक क्षण अनुभवले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजसुधारक, स्वातंत्र्यसैनिक आणि राजकीय नेत्यांना याच ठिकाणी अटक करून कोठडीत ठेवण्यात आले होते. त्यामुळे ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्र नसून, ती स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणींनी भारलेली एक पवित्र भूमी आहे. या इमारतीला तीन भव्य प्रवेशद्वारे असून, पूर्वी येथे अनेक सरकारी कार्यालये कार्यरत होती. त्याचबरोबर ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या निवासासाठी परिसरात उभारलेल्या दगडी चाळी आजही टिकून आहेत, ज्यामुळे या ठिकाणाला एक वेगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

या ऐतिहासिक वास्तूला लागूनच विस्तीर्ण पोलीस परेड मैदान आहे, जे आजही शिस्त, प्रशिक्षण आणि शौर्याची परंपरा जपताना दिसते.

# दिघेंनी लेखनातून वाचकांना अंतर्मुख केले : कर्णिक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

रघुनाथ वामन दिघे हे मराठीतील काळाच्या पुढे जाऊन लेखन करणारे साहित्यिक होते. त्यांच्या साहित्य लेखनाने मराठी वाचकांना कायमच अंतर्मुख केले आहे. कल्पनाविलास न मांडता सामाजिक बांधिलकीतून वास्तवाची स्पष्ट जाणीव दिघे यांच्या साहित्यातून व्यक्त होते. त्यामुळे त्यांचे लेखन मराठी रसिक वाचकांना कायमच नवी दृष्टी देत राहील, अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार हेमंत कर्णिक यांनी व्यक्त केली. कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा खोपोली आयोजित र.वा. दिघे यांची १३० वी जयंती व शाखेच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक रामदास शेंडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

आपल्या भाषणात कर्णिक यांनी दिघे यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेताना लोकसंस्कृती, लोकजीवन, निसर्ग, माणूस, त्यांच्या समजुती, बोलीभाषा यांचा सर्जनशील आविष्कार दिघे यांच्या लेखनातून कसा व्यक्त होतो, याबद्दलची अभ्यासपूर्ण मांडणी केली. ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवरील दिघे आपल्या कथा व कादंबऱ्यांतून समकालीन जीवनाबरोबरच काळाच्या पुढे जाणारा विचार व्यक्त करीत होते. दिघे यांचे साहित्य आशयाबरोबर लेखनशैलीच्या बाबतीतही समकालीन लेखनापेक्षा अनेक बाबतीत वेगळे होते, असे ते म्हणाले. याप्रसंगी नमिता कीर, प्रा.एल. बी. पाटील, संजय गुंजाळ, गणेश कोळी, बी. एस. म्हात्रे, र. वा. यांच्या स्नुषा व साहित्यिक उज्ज्वला दिघे, वामनराव दिघे, रेखा कोरे, प्रकाश राजोपाध्ये आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. दीपप्रज्वलन व र.वा.दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. सर्व मान्यवरांचे स्वागत करून खोपोली शाखेची गेल्या ३५ वर्षातली यशस्वी वाटचाल व सुरू असलेल्या उपक्रमाची माहिती शाखेचे अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये यांनी आपल्या प्रस्ताविकातून दिली.

कुलदीपक शेंडे यांनी र.वा. दिघे यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करून खोपोलीत साहित्य संस्कृतीचा वारसा जतन व्हावा, या उद्देशाने दिघे यांच्या नावाने साहित्य भवन उभारण्याचा मानस व्यक्त केला. अनिलकुमार रानडे काव्यसंग्रहाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. जनता विद्यालयातून मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळून प्रथम आलेल्या श्रद्धा माने या विद्यार्थिनीला कै. भाऊसाहेब कुंटे स्मृती पारितोषिक देण्यात आले. जयश्री पोळ यांना दिघे परिवाराकडून दिला जाणारा कै.र.वा. दिघे स्मृती पुरस्कार देऊन पाहुण्यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.



● मुरुड परिसरात ऋतु बदलाचे संकेत दिसू लागले आहेत, सर्वत्र मनमोहक रंगाची फुले फुलू लागली आहेत. कडक उन्हात सुखद सावली ही फुले देत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# 'कर्जत-माथेरान मार्गावर मिनीबसेस चालवा'



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत एसटी आगाराकडून माथेरानसाठी मिनीबस चालवली जाते. या मार्गावर घाट असल्याने खास बाब म्हणून मागवण्यात आलेल्या दोन्ही मिनीबस कर्जत माथेरान मार्गावर चालवण्यात याव्यात अशी मागणी माथेरानमधील जनार्दन पारटे यांनी माथेरान नगरपरिषदेकडे ही मागणी केली आहे. माथेरान मार्गावर चालवण्यासाठी आणलेली एक मिनीबस कर्जत-पनवेल मार्गावर चालवली जात असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

२०१५ मध्ये तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी माथेरानसाठी दोन मिनीबस दिल्या. पण काही वर्षांनी यातील एक मिनीबस कर्जत-माथेरान ऐवजी कर्जत-पनवेल मार्गावर चालवली जात आहे. तेंव्हा या दोन्हीही बसेस या कर्जत नेरळ माथेरान या मार्गांवर चालविण्यात याव्यात अशी मागणी करणारे निवेदन पारटे यांनी माथेरान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांना दिले आहे.

# पनवेलमध्ये ११३ शाळा आरटीई कक्षेत

- रीतसर अर्ज भरल्यानंतर पालकांना एसएमएस
- प्रवेशाची कक्षा १ किमीवरुन ३ किमीवर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेशाची सोडत जाहीर झाली आहे. गटशिक्षणाधिकारी पनवेल पंचायत समिती या ठिकाणी निवडलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चिती प्रक्रिया ११ ते २० एप्रिल दरम्यान कागदपत्रांची पडताळणी करून करणार आहेत.

पनवेल तालुक्यात यंदा २,६३१ विद्यार्थी आरटीईच्या कक्षेत आहेत. रीतसर ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांच्या पालकांना एसएमएस प्राप्त होण्यास सुरुवात झाली आहे. ज्यांना एसएमएस आले नाहीत त्यांना https:// student.maharashtra.gov .in/ admšportal/Users/rtešindexš घेता येणार आहे.

आरटीईची प्रवेशाची कक्षा १ किमी वाढवून त्यानंतर ३ किमी करण्यात आली होती. मात्र, अनेकांनी अर्ज भरताना केवळ एक किमी अंतराची शाळा अर्जात नमूद केल्याने या प्रक्रियेत काही प्रमाणात गोंधळ निर्माण झाला होता. आरटीईची प्रक्रिया सुरू झाल्याने पुढील काळात पालकांची कागदपत्रांची जुळवाजुळव आणि शिक्षणाधिकाऱ्यांकडे वेळ त्याची पूर्तता करण्यात जाणार आहे. आरटीईच्या कक्षेतील विद्यार्थ्यांना अशा खासगी शाळांमध्ये वेगळी वागणूक दिली जात असल्याचा आरोप पालक करीत आले आहेत. शासनाने अशा शाळांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. अनेक शाळांमध्ये आरटीईच्या विद्यार्थ्यांच्या वेगळ्या तुकड्या बनविल्या आहेत.

> **लॉटरीमधील विद्यार्थ्यांचे कागदपत्र तपासून आरटीई अंतर्गत ज्या शाळेत ॲडमिशन होणार आहे. त्या शाळांना आमच्या मार्फत सूचित केले जाईल. २० एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया चालेल.**
>
> **-साहू सतपाल, गट शिक्षणाधिकारी, पनवेल**

> **आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश देण्याची जबाबदारी शाळेची असते. मात्र, गणवेश आणि पुस्तकांच्या नावाने तब्बल १५ ते २० हजार रुपये या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून आकारण्यात येतात. ते थांबायला हवे.**
>
> **-चेतन वाघ, सामाजिक कार्यकर्ते**

**लहानग्यांच्या चेहऱ्यावर उमटला आनंद | चिमुकली मायरा कदमचे औक्षण करुन स्वागत**

# कोंढेतर्फे श्रीवर्धन अंगणवाडीत प्रवेशोत्सवाचा जल्लोष

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

बालकांच्या शैक्षणिक प्रवासातील पहिलं पाऊल आनंददायी आणि संस्मरणीय ठरावं, या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बागमांडले बिटमधील कोंढेतर्फे श्रीवर्धन येथील अंगणवाडी केंद्रात 'प्रथम प्रवेश दिन' मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाने संपूर्ण परिसरात उत्साहाची लहर निर्माण झाली.




यावेळी अंगणवाडीत नव्याने दाखल झालेल्या चिमुकली मायरा निखिल कदम हिचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून जंगी स्वागत करण्यात आले. फुलांच्या हारांनी, रंगीबेरंगी फुग्यांनी आणि आकर्षक सजावटीने सजलेल्या अंगणवाडी केंद्रामुळे संपूर्ण परिसर एखाद्या सणासारखा उजळून निघाला होता. प्रत्येक कोपऱ्यात आनंद, उत्साह आणि आपुलकीची झळाळी दिसून येत होती. अंगणवाडी सेविका रजनी राजेश कासरुंग यांनी मायराचे औक्षण करून तिच्या कपाळावर टिळा लावला आणि तिला प्रेमाने स्वागत करत शैक्षणिक जीवनाची गोड सुरुवात करून दिली. यावेळी मायराला शैक्षणिक खेळणी, चित्रमय पुस्तके आणि विविध भेटवस्तू देऊन तिच्या शिक्षणप्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. लहानग्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान या सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले.

कार्यक्रमात मायराच्या पहिल्या पावलांचे ठसे घेण्याचा अनोखा आणि भावनिक उपक्रम राबवण्यात आला. या माध्यमातून बालकाच्या जीवनातील हा महत्त्वाचा क्षण कायमस्वरूपी जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला. बाल उद्यान केंद्रात मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात पालकांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

#### आत्मविश्वास वाढवणार उपक्रम

अशा उपक्रमांमुळे लहान मुलांमधील शाळेविषयीची भीती कमी होते. आत्मविश्वास वाढतो आणि शिक्षणाबद्दल आपुलकी निर्माण होते. बालकांच्या आयुष्यातील पहिल्या शैक्षणिक टप्प्याला आनंददायी बनवण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे.

# रस्ते खोदाईमुळे धोका



**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील अलिबाग, रामराज, कुरुळ, चौल आदी परिसरात रस्ते खोदाईमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत असून, भीषण अपघात घडत आहेत. तरी शासनाने व संबंधित कॉन्ट्रॅक्टरने अपघातग्रस्तांना तातडीने मदत करावी, तसेच ठेकेदाराने पावसाळ्यापूर्वी तातडीने पूर्ण करावी, अन्यथा उग्र आंदोलन केले जाईल, असा इशारा अलिबाग ठाकरे गटाचे उपतालुकाप्रमुख कैलास गजने, पिंट्या ठाकूर यांनी दिला आहे. खड्डेमय रस्त्यामुळे बाईकस्वार, पर्यटक महत्त्वाचे म्हणजे शाळा कॉलेजचे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना मोठे त्रास सहन करावे लागत आहे. तसेच वाहनांच्या ट्रॅफिकमुळे प्रवाशांना मोठा विलंब होत आहे. यांची दखल संबंधित कॉन्ट्रॅक्टदारांनी घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

कृषीवल
| रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| RGD/016/2026-28



# खळाळता चैतन्य-स्वर

अवकाशाच्या पोकळीत एखादा धीरगंभीर ओमकार उमटावा तसा एक स्वर या पृथ्वीवर होता. त्याचे नाव लता मंगेशकर. तो दोन वर्षांपूर्वी निमाला. या पृथ्वीवर आणखी एक स्वर होता. थेट स्वर्गातून अवतरलेल्या अवखळ गंगेसारखा मस्त मजेत पुढे पुढे जाणारा हा आणखी चैतन्य प्रवाह होता. हा प्रवाह रविवारी थांबला. या प्रवाहाचे नाव होते आशा भोसले. हे दोन स्वर थांबण्याने या भारतभूमीत जी पोकळी निर्माण झाली आहे ती सहजी भरणारी नाही. हिंदी चित्रपटसृष्टीने गेल्या शंभर वर्षात भारतभरच्या संगीताला एक केले. यात शास्त्रीय संगीत होते तसेच लोकसंगीत, गावरान संगीत सर्व काही होते. यातून संगीताचा एक आधुनिक महासागर निर्माण झाला. तो निर्माण होण्यात अनेक कवी, संगीतकार, वादक वगैरेंची मोठी भूमिका होती. पण या महासागरच्या लाटांनी भिजवण्याचं किंवा त्याच्या तळाशी घेऊन जाऊन समुद्राच्या पोटातील अनमोल रत्नांचे दर्शन घडवण्याचं काम केलं ते दोनच कलावंतांनी. लता आणि आशा. त्यातही लताबाई या थोड्याशा दूरस्थ वाटणाऱ्या. पण आशाताईंचा सूर आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व हे रसिकांशी सहज मैत्री जोडणारे, खेळकर, आश्वासक आणि हसवणारे किंवा उड्या मारायला लावणारे होते. झाले युवती मनासारख्या नाट्यगीतातील अवघड तानांपासून, कानडाऊ विठ्ठलूसारख्या अभंगापर्यंत आणि चांदण्यात फिरताना माझा धरलास हात या भावगीतापासून ते बुगडी माझी सांडली गं किंवा रेशमाच्या रेघांनीसारख्या लावण्यातील शृंगारभावापर्यंत त्यांच्या गाण्यांची रेंज पाहिली तर कोण्या एकाच व्यक्तीने ही सर्व गायिली आहेत यावर विश्वास बसू नये अशी स्थिती आहे. वयाच्या विशी-पंचविशीमध्ये आशाताईंनी पळून जाऊन लग्न केले आणि मंगेशकर हे जादूभरल्या आडनावाचा त्याग केला. त्याची भरपूर किंमत त्यांनी मोजली पण जिद्द सोडली नाही. त्यांचा आनंदी स्वभावही बदलला नाही. किंबहुना, आशा हे नाव त्यांच्याइतके अन्य कोणीही सार्थ केले नसेल इतक्या त्या अखेरपर्यंत चैतन्याने भरलेले आयुष्य जगल्या. हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व संगीतकार लता मंगेशकर या एकाच आवाजाची निवड करीत असल्याने आशा व अन्य गायिकांच्या वाट्याला दुय्यम वा संख्येने कमी गाणी आली. पण त्यातही आशाताई टिकून राहिल्या.

## छाप उमटवली

जी गाणी मिळाली त्यातही त्यांनी आपली छाप उमटवली. एकीकडे मुगले आझमची लताची गाणी प्रचंड गारुड करीत असताना दुसरीकडे मधुबालाच्याच चलती का नाम गाडीसारख्या सिनेमातल्या आशाच्या गाण्यांनीही धमाल केली. इतकेच नव्हे तर काळाची कसोटी पार करून आज ७५ वर्षांनीही ती अमर ठरली. ओपी नय्यर यांनी लताचा आवाज वापरायचा नाही असा पण केला. तो ते करू शकले कारण त्यांच्यापाशी आशा होती. दुसरीकडे लता मंगेशकर यांच्याशी दुरावा आल्याच्या काळात सचिनदेव बर्मन यांनाही आशाचाच आवाज हवासा वाटला व त्यांनी बंदिनी, लाजवंती यासारख्या सिनेमातली अजरामर गाणी दिली. मदनमोहन, रोशन यांच्यासारख्या एरवी लताप्रेमी संगीतकारांनीही आशाबाईंना वेचून वेचून गाणी दिली व बाईंनी त्यांचे सोने केले. निगाहे मिलाने को जी चाहता है या कव्वालीसाठी रोशन थांबून राहिले. आशाबाई काश्मीरहून येईपर्यंत महिनाभर रेकॉर्डिंग पुढे ढकलले. बाईंनी त्याचे सोने केले. राहुलदेव बर्मन यांच्या संगीताचा तर त्या बहिश्चर प्राण होता असे म्हणावे इतके त्या दोघांच्या कलाकृतींमध्ये अद्वैत होते. विशेष म्हणजे पंचमने आपली अनेक गंभीर व उत्कृष्ट गीते लताला दिली व आशाबाई त्याबद्दल काहीशा तक्रारीच्या सुरात बोलत असत. पण तिसरी मंझिलच्या आजा आजा पासून ते पिया तू अब तो आजा आणि नंतर मेरा कुछ सामान किंवा निशापर्यंत आरडीच्या संगीताचा प्रत्येक दागिना आशाबाईंसाठीच घडवला गेला व त्यांनीही तो अत्यंत दिमाखदारपणे धारण केला. मराठीमध्ये आशाबाईंनी घरंदाज मुलींपासून, वत्सल मातेपर्यंत आणि बारीवरच्या नृत्यांगनेपासून ते रोमँटिक नायिकांपर्यंत सर्वांच्या भावना सजीव केल्या. हृदयनाथ मंगेशकर यांना भावगंधर्व म्हटले जाते. स्त्री कलाकाराला ही पदवी द्यायची झाल्यास ती आशाबाईंना द्यावी लागेल. हृदयनाथांचीच नभ उतरू आलं किंवा जिवलगा ही गाणी त्यासाठी ऐकावीत. सुधीर फडके यांच्यासोबतही त्यांनी विपुल काम केले. मराठी मध्यमवर्गाचा आरसा असलेल्या मराठी सिनेमासाठी फडके यांनी गाणी केली. थकले रे नंदलाला, जिवलगा कधी रे येशील तू, या सुखांनो या, उठी श्रीरामा इथपासून दिस जातील दिस येतील इथपर्यंत अनेक गाण्यांमधून मराठी मध्यमवर्गाच्या भावभावनांना आशाबाईंनी स्वर दिला. गंमत म्हणजे पु.ल. देशपांडे यांच्या नाच रे मोरा किंवा खळ्यांच्या गोरी गोरी पान सारख्या बालगीतांमध्ये त्यांचा आवाज जसा फिट बसला तसाच तो चंदेरी वाळूतसारख्या उडत्या गाण्यांमध्ये किंवा कुटं कुटं जायाचं हनिमूनला यासारख्या गाण्यांनाही साजून दिसला.

## शेवटपर्यंत तरुण

१९६९ मध्ये अमेरिकेने दोन अंतराळवीरांना चंद्रावर उतरवले. सर्व जगासाठी हा ऐतिहासिक प्रसंग होता. त्या अंतराळवीरांची नावे होती, नील आर्मस्ट्राँग आणि बझ आल्ड्रीन. यात चंद्रावर पहिले पाऊल टाकले ते आर्मस्ट्राँग याने. त्यानंतर मिनिटांनी आल्ड्रीन उतरला. या दोघांनीही एकच पराक्रम केला. पण घराघरात नाव गेल ते आर्मस्ट्राँगचे. त्याच धर्तीवर लता मंगेशकर या ज्येष्ठ असल्याने त्यांनी आधी गायला सुरुवात केली व त्यांना तितकेच प्रचंड यश मिळाले. आशाताईंनीही तेच पराक्रम केले, तशीच सुरांची प्रतिसृष्टी उभारली. त्या बझ आल्ड्रीनप्रमाणे प्रसिद्धीत मागे पडल्या. पण खऱ्या नक्षत्राचे तेज व प्रकाश लपून राहू शकत नाही. त्याप्रमाणे आशाबाईंच्या कलेचे तेजही हळहळू उजळत गेले आणि रसिकांच्या मनात कायमचे घर करून बसले. आज स्थिती अशी आहे की, सध्याच्या तरुणांना आशाताईंची गाणी आणि त्यांचा आवाज हाच आपला डार्लिंग वाटतो. आशाताईंचे वैशिष्ट्य हे होते की काळानुरूप त्या बदलत गेल्या. कोणत्याच प्रकारची गाणी वा संगीत त्यांनी वर्ज्य न मानल्याने नंतर रॉक व पॉप संगीताच्या जमान्यातही त्या झळाळून उठल्या. अलिकडे क्रिकेटपटू ब्रेट लीसोबतही त्यांनी गाणे गायले होते. डिस्को संगीत ऐन भरात असताना आलिशा चिनॉयसारखे नवीन आवाज पुढे येत होते. पण त्यातही उडीबाबा किंवा डिस्को स्टेशनसारख्या आशाबाईंच्या गाण्यांनी कहर केला. मनाने शेवटपर्यंत तरुण राहिलेल्या आशाबाई कारकीर्दीच्या उत्तरार्धात गाण्याच्या कार्यक्रमांमध्ये स्टेजवर नाचाच्या स्टेप्स टाकू लागत तेव्हा तरुणाई वेडी होऊन जात असे. प्रचंड विपत्ती व कष्टाचे जीवन पाहिल्यानंतर त्यांनी तितकेच विक्रमी यश पाहिले. त्या यशाच्या काळात त्यांच्यावर आपल्याच तरुण मुलांचे मृत्यू पाहण्याचे प्रसंग आले. पण त्या कधीही रडवल्या झाल्या नाहीत. झुकल्या नाहीत. शेवटपर्यंत कार्यक्रम, दौरे चालू राहिले. अलिकडच्या काळात त्यांनी घेतलेल्या राजकीय भूमिका मात्र वादग्रस्त ठरल्या. नरेंद्र मोदी सरकारचे टोकाला जाऊन केलेले त्यांनी केलेले समर्थन त्यांच्या चाहत्यांना आवडणारे नव्हते. पण आशाबाईंनी आयुष्यभर त्यांना इतके काही दिले होते की त्यापुढे बाकी सगळ्या गोष्टी गौण होत्या. आशाबाईंसारखे दैवी स्वर शतकात एखादे वेळी अवतरत असतो. या अवताराचा आता अस्त झाला आहे. त्यांनी गायिलेली गाणी मात्र सुदैवाने आपल्यासोबत शतकानुशतके राहणार आहेत. आशाताईंना कृषीवल परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली.

## विचार

# 'स्वरस्वामिनी'चा निरोप

***भारतीय संगीतविश्व आज गहिवरून गेले आहे. महान गायिका आशा भोसले यांच्या निधनाने केवळ एका व्यक्तीचा नाही, तर एका अख्ख्या सुवर्णयुगाचा अंत झाला आहे. गेली आठ दशके आपल्या जादुई, सुरेल आवाजाने जगाला मंत्रमुग्ध करणाऱ्या या अद्वितीय कलाकाराने वयाच्या ९२ व्या वर्षी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. भारतीय संगीतविश्व एका महान स्वराला मुकले.***





**मधुरा कुलकर्णी**

८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशा भोसले यांचे आयुष्य म्हणजे जिद्द, संघर्ष आणि उत्कटतेची कहाणी आहे. दिग्गज गायक-कलावंत दीनानाथ मंगेशकर यांची कन्या आणि स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांची धाकटी बहीण म्हणून त्यांची ओळख असली, तरी त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली, तीही अत्यंत खडतर वाटचालीतून. सुमारे १५ ते १६ हजार गाण्यांना आवाज देत त्यांनी केवळ हिंदीच नव्हे, तर मराठी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियन भाषांमध्येही आपल्या कलेचा ठसा उमटवला. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात १९४८ मध्ये 'चुनरिया' या चित्रपटासाठी गायलेल्या गाण्याने झाली आणि त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. शास्त्रीय संगीत, गझल, भजन, पॉप आणि चित्रपटसंगीत अशा प्रत्येक प्रकारात त्यांनी आपल्या आवाजाचा अद्वितीय ठसा उमटवला. 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा', 'चुरा लिया है तुमने' आणि 'इन आँखों की मस्ती के' यांसारखी गाणी आजही रसिकांच्या ओठांवर रेंगाळतात आणि त्यांच्या कलेची साक्ष देतात. आशा भोसले यांच्या यशामागे त्यांची बहुआयामी प्रतिभा जितकी कारणीभूत आहे, तितकाच त्यांच्या सहकाऱ्यांचा वाटाही महत्त्वाचा आहे.

ओ. पी. नय्यर आणि आर. डी. बर्मन (पंचम दा) यांच्यासोबतची त्यांची जुगलबंदी ही भारतीय संगीताच्या इतिहासातील एक सुवर्णप्रकरण आहे. विशेषतः आर. डी. बर्मन यांच्याशी असलेले त्यांचे वैयक्तिक आणि व्यावसायिक नाते संगीतातल्या नव्या प्रयोगांना चालना देणारे ठरले. भारत सरकारने त्यांच्या या भव्य योगदानाची दखल घेत त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार आणि पद्मविभूषण यांसारख्या सर्वोच्च सन्मानांनी गौरवले; मात्र कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठा सन्मान त्यांना रसिकांच्या प्रेमातून लाभला. वयाच्या नव्वदाव्या वर्षी रियाज करून व्यासपीठावर खणखणीत आवाजात गाणे हे फक्त आशादीदीच करू शकतात. लता मंगेशकर यांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी अजून भरून निघालेली नसतानाच आता आशा भोसले यांच्याही जाण्याने संगीतप्रेमींच्या मनात एक खोल, न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. हा केवळ एका कलाकाराचा अंत नाही, तर त्या काळाचा निरोप आहे, जेव्हा संगीत केवळ ऐकले जात नव्हते, तर ते जगले जात होते. आज प्रत्येक रसिकाच्या डोळ्यांमध्ये अश्रू आहेत. कारण आशा भोसले यांच्या आवाजात त्यांनी प्रेम अनुभवले, वेदना जाणल्या आणि आनंद साजरा केला. त्यांच्या स्वरांनी आयुष्याच्या प्रत्येक भावनेला अभिव्यक्ती दिली. निसर्गाचा नियम अटळ आहे. जन्म आणि मृत्यू यांची साखळी अखंड सुरूच असते; परंतु काही आवाज असे असतात, जे काळाच्या पलीकडे जातात. आशा भोसले यांचा स्वर हा त्यापैकीच एक. तो आज भौतिक रूपाने थांबला असला, तरी त्यांच्या गाण्यांतून तो सदैव जिवंत राहील.

आधुनिक भारतीय संगीताच्या इतिहासात काही आवाज असे आहेत, जे केवळ काळाला साथ देत नाहीत, तर काळ घडवतात. आशा भोसले हा त्यापैकीच एक अद्वितीय स्वर आहे. वयाच्या नव्वदीपार टप्प्यावरही 'माझं अजून काम संपलेलं नाही' असे ठामपणे सांगणारी ही गायिका केवळ एक व्यक्ती नाही, तर भारतीय सांस्कृतिक प्रवाहातील एक जिवंत ऊर्जा आहे. त्यांच्या आयुष्याचा आणि कलेचा मागोवा घेतला, तर तो केवळ यशाचा प्रवास वाटत नाही, तर तो सामाजिक बंधनांना दिलेल्या प्रत्युत्तरांचा, वैयक्तिक संघर्षांचा आणि सतत नव्याचा शोध घेणाऱ्या वृत्तीचा एक दीर्घ, गुंतागुंतीचा प्रवास वाटतो. आशा भोसले यांची कारकीर्द समजून घ्यायची असेल, तर त्या पुढे आल्या, तो काळ लक्षात घ्यावा लागतो. त्या वेळी स्त्री गायिकांवर विशिष्ट प्रकारची 'सभ्यता' लादली जात होती. गाण्यांचे प्रकार, सादरीकरणाची पद्धत, आवाजातील भाव या सर्वांवर एक अदृश्य नियंत्रण होते. अशा वेळी आशा भोसले यांनी जाणीवपूर्वक किंवा परिस्थितीमुळे त्या चौकटी मोडण्याचा मार्ग स्वीकारला.

कारकिर्दीच्या या टप्प्यावर कॅबरे, नाईटक्लब, मोहक आणि सूचक गाणी, जी त्या काळात 'दुसऱ्या श्रेणी'ची मानली जात होती, त्यांनी आत्मविश्वासाने गायली. आणि या निवडीमुळेच त्यांनी स्वतःसाठी एक स्वतंत्र, वेगळी जागा निर्माण केली. त्यांच्या सुरुवातीच्या आयुष्यातील संघर्ष हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात, बॉलीवूडमध्ये आशादीदींना एक कॅबरे गायिका म्हणूनच ओळखले जात होते. त्यांना कधीही सर्वोत्तम गायनाच्या संधी मिळाल्या नाहीत. अनेकदा नाकारलेल्या संधीच दिल्या जात असत; परंतु त्यांनी आपल्याकडे आलेले प्रत्येक काम स्वीकारून त्याचे सोने केले. 'असे दिवस होते, जेव्हा मी एका दिवसात चार गाणी रेकॉर्ड करायचे,' असे त्या आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण काढताना सांगायच्या; मात्र ओ.पी. नय्यर आणि त्यानंतर आर.डी. बर्मन यांच्यासोबतच्या त्यांच्या यशस्वी जोडीने ते वाईट दिवस संपवले आणि आशाताईंना बॉलिवूडमधील आतापर्यंतच्या सर्वात यशस्वी गायकांपैकी एक बनवले. येथे नमूद करण्यासारखा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लता मंगेशकर यांची बहीण असल्यामुळे त्यांना इतर गायकांपेक्षा कधीच अधिक महत्त्व मिळाले नाही. किंबहुना, त्यांची लतादीदींशी नेहमीच अयोग्यरित्या तुलना केली जात असे, हे आशाताईंनीच एका ठिकाणी सांगितले होते.

अल्पवयात झालेला विवाह, त्यानंतरची प्रतिकूल परिस्थिती, संसारातील ताणतणाव आणि जबाबदाऱ्या या सगळ्यांनी त्यांना मोडून काढण्याऐवजी अधिक कठोर आणि लवचिक बनवले. त्यांच्या आयुष्यातील 'गरज' हीच त्यांच्या कारकिर्दीची प्रेरणा ठरली. त्यामुळेच त्यांनी कधीही कामाची निवड 'प्रतिष्ठेच्या' निकषावर केली नाही. त्यांनी ती 'अस्तित्वाच्या' निकषावर केली आणि याच निर्णयांनी पुढे त्यांच्या कलेला एक अद्वितीय आयाम दिला. ओ. पी. नय्यर यांच्यासोबतची त्यांची जोडी ही त्यांच्या कारकिर्दीतील पहिली मोठी क्रांती होती. नय्यर यांच्या ठसठशीत, लयप्रधान संगीताला आशांच्या आवाजाने एक वेगळीच धार मिळाली. 'आइये मेहरबान', 'ये है रेशमी जुल्फों का अंधेरा', 'उडे जब जब जुल्फें तेरी' यांसारख्या गाण्यांनी केवळ लोकप्रियता मिळवली नाही, तर एक नवे गानविश्व तयार केले. या गाण्यांमध्ये स्त्री केवळ निष्क्रिय किंवा लाजाळू नाही, तर ती आत्मविश्वासपूर्ण, आकर्षक आणि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव असलेली आहे, ही प्रतिमा आशाताईंच्या आवाजातून ठळकपणे समोर आली.

आशाताईंच्या कारकिर्दीमध्ये खरा टर्निंग पॉइंट आला तो आर. डी. बर्मन यांच्या सहकार्याने. 'तीसरी मंझिल' हा केवळ एक यशस्वी चित्रपट नव्हता, तर हिंदी चित्रपटसंगीतातील एका नव्या युगाची सुरुवात होती. 'आजा आजा, मैं हूँ प्यार तेरा' या गाण्यातील ऊर्जा, श्वासाचा वापर, लयबद्धताव या सगळ्यांनी संगीताच्या पारंपरिक चौकटी हलवून टाकल्या. आशा भोसले यांचा आवाज इथे केवळ गाणं सादर करत नाही, तर एक अनुभव निर्माण करतो. आशा भोसले यांचा सर्वात मोठा प्रभाव पडतो तो पडद्यावरील स्त्रीच्या प्रतिमेवर. १९७० आणि ८० च्या दशकात हिंदी चित्रपटांमध्ये स्त्रीची प्रतिमा बदलत होती, ती अधिक स्वतंत्र, धाडसी आणि आत्मविश्वासपूर्ण होत होती. या बदलामागे आशाताईंच्या आवाजाचा मोठा वाटा आहे. 'दम मारो दम' मधील हिप्पी बंडखोरी असो किंवा 'जवानी जानेमन' मधील आधुनिकतेचा आविष्कार या सर्व प्रतिमा आशाजींच्या आवाजामुळे अधिक जिवंत आणि विश्वासार्ह बनल्या. त्यांची आठवण अवघा देश युगानुयुगे काढत राहील.

# मेलडी क्वीन आशाताई काळाच्या पडद्याआड

**श्याम ठाणेदार**

गेली सात दशके आपल्या जादुई स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा रविवार दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वावरच नाही तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. आशाताईंच्या निधनाने केवळ संगीत विश्वाचीच नाही तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने संगीत विश्वाला वाहून घेतलेला आणि आपल्या जादुई स्वरांनी संपूर्ण संगीत विश्वावर अधिराज्य गाजवणारा शेवटचा तारा निखळला. भारतीय संगीत विश्व ज्यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही अशा मोजक्या कलाकारात त्यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. ८ सप्टेंबर रोजीच आशाताईंचा ९२ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांचा उत्साह पाहता त्या वयाची शंभरी पार करतील असेच वाटत होते पण नियतीला हे मान्य नव्हते असेच म्हणावे लागेल. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी ३ तासांचा संगीत कार्यक्रम केला होता असे कोणाला सांगितले तर कोणाचा त्यावर विश्वासही बसणार नाही.



कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये वयाच्या नव्वदीतही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा होती. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी होती की त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. तीन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले होते तेव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली.

या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है हे गाणे गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आज थांबला. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

२००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही गायली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. त्यांच्या निधनाने संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणारी मेलडी क्वीन काळाच्या पडद्याआड गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मेलडी क्वीन आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली!

## लोकसंसद

### बारामतीतून काँग्रेसची माघार कार्यकर्त्यांना धक्का देणारी...

बारामती विधानसभेचे विद्यमान आमदार अजित पवार व अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी मतदार संघाचे आमदार शिवाजी कर्डिले यांचे निधन झाल्याने रिक्त जागेवर २३ एप्रिल रोजी मतदान होते आहे बारामतीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार तर राहुरी येथून कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले हे निवडणूक लढवत आहेत बारामती विधानसभेसाठी सुनेत्रा पवार यांच्या विरोधात आकाश मोरे यांनी काँग्रेस पक्षाकडून अर्ज दाखल केला होता पण अखेरच्या क्षणी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमुळे या निवडणुकीतून माघार घ्यावी लागली आहे त्यामुळे आता हि जागा वनसाईड विजयाच्या बाजूने घोडदौड सुरू आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही राहुरीचीहि तीच परिस्थिती आहे दोन्हीं मतदार संघात निवडणूक होणारं आहे पण राष्ट्रवादी आणि भाजपा उमेदवारांना पाठींबा मिळाल्यामुळे हे उमेदवार सहज निवडून येणारं आहेत मात्र बारामतीतून काँग्रेसने माघारी घायला नको होते कारण महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव ॲड. आकाश मोरे यांनी अर्ज दाखल केला होता तो निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल कारण आकाश मोरे यांनी अजीत पवारांच्या अपघाताच्या तपासाचा मुद्दा असून या मुद्द्याला वाचा फोडण्यासाठी आम्ही बारामतीच्या मैदानात उतरल्याचे म्हंटले होते त्यामूळे सरकारला त्यांची जागा दाखवून देण्यासाठी हि लढाई महत्वाची मानली जात होती मात्र पक्षाच्या आणि महाआघाडी मित्र पक्षामुळे ऐनवेळी मोरेंना अर्थातच काँग्रेसला माघारी घ्यावी लागली हा निर्णय कार्यकर्त्यांना धक्का देणारा आहे सर्वकाही ठरवूनच होते आहे त्यामुळे या सर्वात दादांचा विषय बेदखल होताना दिसून येतो आहे त्यामूळे आगामी काळात या निवडणुकीतून काय निष्कर्ष निघतो ते पहाणे मोठे रंजक ठरणार आहे !

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

## दिनविशेष

# जालियनवाला बाग हत्याकांड

१३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बाग हत्याकांड घडले. अमृतसर हे अखंड भारतातील पंजाब राज्यातील एक महत्त्वाचे शहर होते. ज्यांच्यावर तडीपारीचा आदेश जारी करण्यात आला होता ते सत्यपाल आणि सैफुद्दीन किचलू या दोन प्रसिद्ध स्वातंत्र्यवीरांच्या सुटकेच्या मागणीसाठी १० एप्रिल १९१९ रोजी सकाळी एक घोळका अमृतसरच्या डेप्युटी कमिशनरच्या घराकडे निघाला होता. या घोळक्यावर सैन्याच्या एका तुकडीने बेछूट गोळीबार केला. त्याचे पडसाद त्याच दिवशी उमटले. ब्रिटिश सरकारच्या अस्तित्वाची जाणीव करून देणाऱ्या इमारतींना आगी लावण्यात आल्या.



टाऊन हॉल, दोन बँकांच्या इमारती, तारघर, रेल्वेचे गोदाम वगैरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. त्यानंतर दोन दिवस अमृतसर शांत होते, पण पंजाबमधील इतर भागात मात्र हिंसा चालू होतीच. या प्रक्षोभक दंग्यांमुळे अखेर १३ एप्रिल रोजी पंजाबमध्ये मार्शल लॉ जारी करण्यात आला. योगायोग असा की १३ एप्रिलला पंजाबी जनतेचा प्रिय सण 'बैसाखी'ही होता. रिवाजानुसार हिंदू आणि शीख जनता सण साजरा करण्यास एकत्र जमले. त्यासाठी मोठा जनसमुदाय जालियानवाला बागेत जमला होता, पण मार्शल लॉमुळे जमावबंदी लागू होती. पाच किंवा जास्त जणांचा जमाव नियमबाह्य होता. १३ एप्रिल या दिवशी जनरल रेजिनाल्ड डायरने अमृतसर येथील जालियनवाला बाग या ठिकाणी हे हत्याकांड घडवून आणले. जनरल डायर याच्या हुकूमावरून लष्कराने निःशस्त्र लोकांच्या सभेवर रायफलींच्या १,६०० फैरी झाडल्या. या सभेत स्त्रिया आणि पुरुषांसोबत लहान मुलांचाही समावेश होता. अधिकृत सूत्रांच्या हवाल्यातून या हत्याकांडामध्ये ३७९ लोकांचा मृत्यू झाला. सन १९१९ साली ब्रिटिश सरकार रौलेट कायदा आणण्याच्या तयारीत होते. या कायद्यामुळे कोणत्याही भारतीयला फक्त संशयावरुन, कोणताही खटला दाखल न करता तुरुंगात टाकण्याचा अधिकार ब्रिटिशांना मिळणार होता. भारतीयांनी या कायद्याला कडाडून विरोध केला. पण त्याला न जुमानता ८ मार्चपासून हा कायदा लागू करण्यात आला. याच्या निषेधार्थ ठिकठिकाणी आंदोलनं, निदर्शने सुरू झाली.

रौलेट कायद्याच्या विरोधात महात्मा गांधी यांनी ६ एप्रिल रोजी देशव्यापी आंदोलन घोषित केलं. त्यावेळी अमृतसरचे लोकप्रिय नेते डॉ. सत्यपाल आणि सैफुद्दीन किचलू यांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्या या अटकेचा निषेध करण्यासाठी लोकांनी आंदोलन सुरू केलं. त्याच्या विरोधात ब्रिटिशांनी पंजाबमध्ये मार्शल लॉ पुकारला आणि कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी ब्रिगेडियर जनरल डायर यांच्याकडे सोपवली.

१३ एप्रिल रोजी अमृतसरमधील जालियनवाला बाग येथे रौलेट कायदा मागे घेण्यासाठी आणि नेत्यांची सुटका करण्यासाठी अमृतसरमधील हजारो लोक जालियनवाला बागेत एकत्र जमले. त्यावेळी या जमावावर जनरल डायरने अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात हजाराच्या वर लोकांना आपला जीव गमवावा लागला, अनेकांनी आपला जीव वाचवण्यासाठी त्या ठिकाणच्या विहिरीत उड्या घेतल्या. नंतर या घटनेची चौकशी करण्यासाठी हंटर कमिशनची नियुक्ती करण्यात आली. पण हंटर कमिशनने या गोळीबारात केवळ ३७९ लोकांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# वाढवण बंदरासाठी ७६ हजार २२० कोटींची मंजुरी

## भूसंपादनापोटी १९१६ कोटींची भरपाई वेगाने वितरीत

**आठ लेन महामार्गासह कनेक्टिव्हिटीला गती**
**२३६० कोटींमध्ये महामार्गाचे काम जे कुमार इन्फ्राकडे**

**| पालघर | प्रतिनिधी|**

देशाच्या लॉजिस्टिक क्षेत्राला नवी झेप देणाऱ्या वाढवण बंदर प्रकल्पाला केंद्र सरकारकडून मोठी चालना मिळाली असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी तब्बल ७६,२२० कोटींची मंजुरी देण्यात आली आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी यांच्याकडे सागरमाला कार्यक्रमांतर्गत या बंदराच्या विकासाची धुरा सोपवण्यात आली आहे.



प्रस्तावित वाढवण बंदराला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वाहतूक नेटवर्कशी जोडण्यासाठी नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया पुढाकार घेत असून, एनएच ४८ व दिल्ली–मुंबई एक्सप्रेसवे यांच्याशी सुसज्ज रस्ते संपर्क उभारण्यात येणार आहे. सध्या प्रकल्प परिसरातील दोन लेनचे रस्ते मर्यादित क्षमतेचे असून वस्ती भागातून जात असल्याने वाहतुकीवर मोठा ताण आहे.

या पार्श्वभूमीवर एनएचएआयने एनएच२४८एस मार्गावर ४ लेन (भविष्यात ८ लेनपर्यंत विस्तारयोग्य) नियंत्रित प्रवेश असलेला आधुनिक महामार्ग उभारण्याचे नियोजन केले आहे. हा महामार्ग वाढवण बंदराला –४८ वरील तवा गावाशी थेट जोडणार असून, यामुळे वाहतूक व्यवस्थेत मोठी सुधारणा अपेक्षित आहे.

दरम्यान, पर्यावरणीय दृष्टीनेही प्रकल्पाला आवश्यक मंजुरी मिळाली आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांनी १६ फेब्रुवारी २०२४ रोजी पर्यावरण व सीआरझेड मंजुरी दिली आहे. तसेच २० मार्च २०२६ रोजी नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयाकडून २३७.०८ हेक्टर वनजमीन मिळण्यासाठी पहिल्या टप्प्याची मंजुरी मिळाली आहे.

या मंजुरीनुसार, भरपाई वनरोपण, निव्वळ वर्तमान मूल्य, वन्यजीव संरक्षण, मृदा व आर्द्रता संवर्धन तसेच मँग्रोव्ह लागवड यांसाठी सुमारे १४६.२२ कोटी वन विभागाकडे जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

प्रकल्पासाठी एकूण ६०६.५४ हेक्टर जमीन आवश्यक असून, जमीन व मालमत्तेसाठी १९१६.२३ कोटींची भरपाई भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना यामधील योग्य मोबदला आणि पारदर्शकतेचा हक्क कायदा, २०१३ या कायद्यांतर्गत जाहीर करण्यात आली आहे. सध्या या भरपाईचे वितरण वेगाने सुरू आहे.

दरम्यान, या महामार्ग प्रकल्पाचे काम जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट्स यांना २३६० कोटींमध्ये देण्यात आले असून, ३० मार्च २०२६ रोजी निधी वितरीत करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## वसईच्या शिक्षिकेचा अपघातात मृत्यू

**| विरार | प्रतिनिधी |**

वसईतील शिक्षिका बसची वाट बघत उभी असताना भरधाव वेगात आलेल्या ट्रकने धडक दिल्याने तिचा जागीच मृत्यू झाल्याची घटना आज घडली.वसई पूर्वेतील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या स्वीडन गोम्स (४०) या शनिवारी शाळेत जाण्यासाठी आपल्या घरातून निघाल्या होत्या. पुढील प्रवासासाठी त्या मार्गावरून शाळेकडे जाणारी बस, रिक्षा किंवा इतर वाहन मिळवण्यासाठी वज्रेश्वरी रस्त्याकडे पायी जात असताना एका भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने गोम्स यांना मागून जोरदार धडक दिली.या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या व जागीच त्यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच मांडवी पोलिसांनी अपघातस्थळी धाव घेत रुग्णवाहिकेतून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. या अपघातातील ट्रकचालक फरार असून पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास केला जात आहे.

# समर्पित मालवाहतूक मार्गाची चाचणी यशस्वी

## डबल डेकर मालगाड्या धावणे होणार शक्य

**| पालघर | प्रतिनिधी |**

पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गाच्या न्यू सफाळे ते जेएनपीटी दरम्यानच्या रेल्वे मार्गाचे रखडलेले काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरून दुतर्फा मालगाड्यांची वाहतूक करून यशस्वी चाचणी पूर्ण झाली. यामुळे या मार्गिके वरून डबल डेकर मालगाड्या धावणे शक्य होणार आहे. तसेच पश्चिम रेल्वेच्या वसई ते डहाणू दरम्यानच्या उपनगरीय मार्गिकेवरील भार हलका होणार असून या मार्गावर नवीन उपनगरीय सेवा सुरू करण्याचा मार्ग खुला झाला आहे.



पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गाची जेएनपीटीपर्यंतची जोडणी पूर्ण झाली असून, या मार्गावरून जेएनपीटी न्यू सफाळे विभागात पहिल्या इलेक्ट्रिक इंजिनची चाचणी ३१ मार्च रोजी यशस्वीपणे पार पडली. यामुळे आता उत्तर प्रदेशमधील दादरी ते मुंबईतील जेएनपीटी दरम्यान अखंड मालवाहू रेल्वेगाडी चालवण्याचा मार्ग खुला झाला.

या यशस्वी चाचणीनंतर जेएनपीटी ते थेट दादरी दरम्यान मालवाहतूक सुरू होण्याचा मार्ग खुला झाला आहे. ३० मार्च रोजी दुपारी १.५८ वाजता ६०१३३ क्रमांकाचे इंजीन जेएनपीटीतील नव्या डीएफसी या यार्डातून रवाना झाले. हे इंजीन सायंकाळी ७.२० वाजता न्यू सफाळे स्थानकात दाखल झाले. १०२ किमीचे अंतर इंजिनने पाच तास २२ मिनिटांत पार केले. चाचणी यशस्वी झाल्याने नवा दुहेरी मालवाहतुकीचा मार्ग वाहतुकीसाठी मोकळा झाला आहे. नव्या रुळांच्या क्षमतेच्या तपासणीसाठी दोन्ही दिशेने कंटेनर जोडलेल्या मालगाड्या चालविण्यात आल्या. जेएनपीटी ते न्यू सफाळे दरम्यान इलेक्ट्रिक इंजीन आणि न्यू सफाळे ते जेएनपीटी दरम्यान डिझेल इंजिनची मालगाडी धावली. एकाच वेळी दोन्ही दिशेने मालगाड्या धावत्या करून संपूर्ण विभागाची तपासणी करून देण्यात आली आहे.

## बोईसरमध्ये स्पावर पोलिसांचा छापा

**बोईसर :** बोईसर पूर्वेकडील बेटेगाव परिसरातील एका स्पामध्ये सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायावर बोईसर पोलिसांनी शुक्रवारी अचानक छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. स्पातील तीन कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. स्पाचा व्यवस्थापक फरार आहे. अटक आरोपींना शनिवारी पालघर येथील न्यायालयात हजर केले जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### शैक्षणिक उपक्रमांनी साजरी करा
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**| ठाणे | प्रतिनिधी |**


समाजातील आर्थिक दुर्बल व आदिवासी भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या महामानव प्रतिष्ठान व एक वही एक पेन अभियानने यंदाची डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती शैक्षणिक उपक्रम राबवून साजरी करण्याचे आवाहन केले आहे.

महापुरुषांच्या जयंती, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, सार्वजनिक गणेशोत्सव, शिवजयंती तसेच मान्यवर व्यक्तींच्या वाढदिवसानिमित्त लाखो रूपयांचा खर्च केला जातो. यातील काही अनावश्यक खर्चाला फाटा देवून समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, विद्यार्थी दत्तक घेणे, विनामूल्य एमपीएससी–युपीएससी क्लासेस चालवणे, शाळांमध्ये तसेच वस्त्यांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक प्रवासाविषयी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेणे त्याचप्रमाणे शक्य आहे, असे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

# मालवण देवलीमध्ये एका घरात कोसळला ५ किलोचा बर्फाचा गोळा

**| सावंतवाडी | प्रतिनिधी |**

मालवण तालुक्यातील देवली येथील खालची परबवाडी येथे भर उन्हाळ्यात विजय मधुकर देऊळकर यांच्या घराच्या छपरावर सुमारे ५ किलो वजनाचा बर्फाचा मोठा तुकडा कोसळला. या भीषण प्रहाराने घराच्या छपराची कौले आणि लाकडी रिप तुटून मोठा आवाज झाला. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास विजय देऊळकर यांचे कुटुंब आपल्या दैनंदिन कामात व्यस्त होते. घरातील महिला अर्चना विजय देऊळकर स्वयंपाकघरात असताना अचानक मोठा आवाज झाला. त्यांनी धावत जाऊन पाहिले असता, छप्पर फोडून एक अजस्त्र बर्फाचा तुकडा स्वयंपाकघरात पडला होता. घराचे छप्पर फुटल्याने आणि कौले उडाल्याने आजूबाजूच्या लोकांची मोठी धावपळ उडाली.

घटना घडली तेव्हा परिसरात ढगाळ वातावरण नव्हते किंवा पावसाचे कोणतेही संकेत नव्हते. भर उन्हात आकाशातून थेट ५ किलोचा बर्फाचा तुकडा पडल्याने ग्रामस्थांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. देऊळकर यांच्या घराच्या अवतीभवती कोणताही उंच रस्ता किंवा चढण नसताना हे घडल्याने ही बाब रहस्यमय बनली आहे.

# भीम जयंतीचा अतिरेक धोकादायक : सुजात आंबेडकर

**| पुणे | प्रतिनिधी|**

भीम जयंतीच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या सादरीकरणात होत असलेल्या विकृतीकरणाबाबत वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. च्या माध्यमातून तयार होणारे पोस्टर्स आणि बॅनर्स मोठ्या प्रमाणावर वापरले जात असून, हा प्रकार चळवळीच्या दृष्टीने धोकादायक ठरत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



जगभरात बाबासाहेबांच्या जयंतीची तयारी सुरू असताना निर्मित सामग्रीद्वारे त्यांच्या विचारांची मोडतोड केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. देशात काही ठिकाणी बाबासाहेबांच्या योगदानाला कमी लेखण्याचा प्रयत्न होत असून, भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून बी. एन. राव यांचे नाव पुढे करून खोटा प्रचार केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कडून बाबासाहेबांचे विचार समरसतावादी असल्याचा अजेंडा राबवला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच पूर्वी बाबासाहेबांना विरोध करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व तथाकथित पुरोगामी गटांकडूनही त्यांच्या विचारांचे चुकीचे प्रतिनिधित्व केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या पिढीतील आंबेडकरी तरुणांनी बाबासाहेबांचे मूळ लेखन, विशेषतः मधील विचार वाचण्याकडे दुर्लक्ष केल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ओरिजिनल साहित्य बाजूला ठेवून निर्मित मजकूर आणि चित्रांचा प्रसार वाढत असल्याने हा प्रवाह थांबवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबासाहेबांचे हजारो मूळ फोटो उपलब्ध असताना तयार चित्रांचा अट्टहास करण्याचे कारण काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच या प्रवृत्तीमुळे स्थानिक कलाकारांच्या कलेवर आणि उपजीविकेवर परिणाम होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बाबासाहेबांचे खरे विचार आणि मूळ स्वरूप जपण्यासाठी सर्वांनी त्यांच्या ओरिजिनल फोटोंचाच वापर करावा आणि भीम जयंती उत्साहात साजरी करावी, असे आवाहन सुजात आंबेडकर यांनी केले आहे.

# एप्रिल-जून अन्नधान्याचे आगाऊ वितरण प्रक्रिया प्रभावीपणे सुरू

**| मुंबई | प्रतिनिधी |**

एप्रिल ते जून २०२६ या कालावधीतील अन्नधान्याची आगाऊ उचल करून तात्काळ वितरण करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिल्यानंतर राज्य शासनाने या प्रक्रियेला वेग देत युद्धपातळीवर अंमलबजावणी सुरू केली आहे. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आले असून सर्व यंत्रणा सक्रिय करण्यात आल्या आहेत, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

मार्च २०२६ महिन्याचे वितरण वेळेत पूर्ण न झाल्याने केंद्र शासनाने ७ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली होती. त्या अनुषंगाने ईपॉस प्रणालीवर वितरण सुरू होते. त्यानंतर ८ एप्रिलपासून एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे एकत्रित वितरण ईपॉस मशीनद्वारे सुरू करण्यात आले आहे. सध्या कोणत्याही ईपॉस यंत्रणेत तांत्रिक अडचण नसून वितरण प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शासनाकडून अन्नधान्य उचल आणि वितरणासाठी सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे.

**उत्पादन आले २५ टक्क्यांवर | हंगाम लवकर आटपण्याची शक्यता**

# हापूसला अवकाळी पावसाचा फटका

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

कोकणातील हापूस आंब्याला यंदा अवकाळी पावसाचा मोठा फटका बसल्याने उत्पादनात लक्षणीय घट झाली असून केवळ सुमारे २५ टक्केच उत्पन्न उपलब्ध झाले आहे. परिणामी, यंदाचा हंगाम मर्यादित राहण्याचे स्पष्ट झाले असून दरवर्षीपेक्षा लवकर म्हणजेच १० मेच्या आधीच आटपण्याची शक्यता व्यापारी आणि आंबा बागायतदारांकडून वर्तवली जात आहे.



हंगामाच्या सुरुवातीपासूनच बाजारातील आवक कमी राहिली असली, तरी सध्या त्यात हळूहळू वाढ दिसू लागली आहे. कोकणातून मर्यादित प्रमाणात हापूसच्या पेट्या बाजारात दाखल होत असून, दक्षिण भारतातूनही मोठ्या प्रमाणात पेट्यांची आवक सुरू झाली आहे. दरवर्षी या काळात साधारण एक लाख पेट्यांची आवक होत असते; मात्र यंदा ती मोठ्या प्रमाणात घटली आहे. सध्या एकूण आवक सुमारे ४० हजार पेट्यांपर्यंत पोहोचली असून पुढील काही दिवसांत ती ५० ते ५५ हजार पेट्यांपर्यंत जाण्याची शक्यता मुंबई एपीएमसीतील आंबा व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.

हंगामाच्या विविध टप्प्यांवरही याचा परिणाम दिसून येत आहे. १० मेपर्यंत बाजारात आवक टिकून राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर देवगड व सिंधुदुर्ग भागातील आंब्यांची उपलब्धता कमी होईल, तर रत्नागिरी व इतर भागातील आंबे २५ मेपर्यंत बाजारात राहतील. पुढे गुजरात व जुन्नर भागातील आंब्यांची आवक सुरू होणार असली, तरी कोकणातील हापूसचा हंगाम त्यापूर्वीच ओसरेल असे मत आंबा व्यापारी संजय पानसरे यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, आखाती देशातील युद्ध थांबल्याचे म्हटले जात असले तर अंतर्गत कुरघोड्यांमुळे सागरी मार्गाने होणाऱ्या निर्यातीला मोठा फटका बसला आहे. अद्याप आखाती देशातील सागरी मार्गाने होणारी निर्यात सुरू न झाल्याने कोकणातील आणि भारतीय आंबा यंदा आखाती देशातील महत्वाच्या आणि मोठ्या बाजारपेठेला मुकला आहे.

त्याशिवाय इतर देशातील निर्यातीवरही वाढत्या वाहतूक खर्चाचा परिणाम झाला आहे. युरोप आणि अमेरिका या बाजारपेठांमध्ये निर्यात अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसून, हवाई वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अमेरिकेसाठी सुमारे ६०० रुपये प्रति किलो, तर युरोपातील देशांसाठी सुमारे ४०० रुपये प्रति किलो इतका खर्च येत असल्याने निर्यातदारांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

गुणवत्तेनुसार पेटीमागे २ हजार ते ६ हजार रुपये दर मिळत असून उत्तम दर्जाच्या आंब्यांना ५,५०० ते ६,००० रुपये दर मिळत आहे. इतर राज्यांचा आंबा १०० ते २०० रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे. याशिवाय बदामी, लालबाग यांसारख्या इतर जातींच्या आंब्यांची आवक वाढत असून त्यांचे दर अनुक्रमे ८० ते ११० रुपये आणि ७० ते १०० रुपये प्रति किलो दरम्यान आहेत.

## निवडक

### श्रीक्षेत्र मार्लेश्वर नॉट रिचेबल

**चिपळूण :** कोकणातील प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र मार्लेश्वर येथे भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि तातडीच्या संपर्कासाठी भारत नेट सुविधा उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. मात्र, यात्रा संपून गेल्यानंतरही या ठिकाणी नेटवर्कची कोणतीही सुविधा उपलब्ध झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे आजही येथे येणाऱ्या लाखो भाविकांना नेटवर्कअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे. श्री क्षेत्र मार्लेश्वर हे ठिकाण डोंगरदऱ्यांत आणि घनदाट जंगलात वसलेले आहे. या भौगोलिक परिस्थितीमुळे हे क्षेत्र दरड कोसळणे आणि भूकंपप्रवण क्षेत्रात मोडते. याच पार्श्वभूमीवर, १२ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत भरलेल्या वार्षिक यात्रेदरम्यान कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने मदत कार्य राबवता यावे, यासाठी मोबाईल नेटवर्क असणे अत्यंत आवश्यक होते.या सुविधेसाठी मारळ–निवधे ग्रुप ग्रामपंचायतीने २९ डिसेंबर २०२५ रोजी पत्राद्वारे मागणी केली होती. ग्रामपंचायतीच्या या मागणीची दखल घेत रत्नागिरीचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष मनुज जिंदल यांनी ३० डिसेंबर २०२५ रोजी भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेडला पत्र लिहून १० जानेवारी २०२६ पासून या ठिकाणी सेवा कार्यान्वित करण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाकडे संबंधित विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, मार्लेश्वर येथे बीएसएनएल कंपनीचा मनोरा उभा आहे, परंतु प्रत्यक्षात तेथे कोणतीही सेवा कार्यान्वित नाही. यात्रेचा मुख्य काळ संपला असला तरी, सध्याही या पर्यटनस्थळी आणि तीर्थक्षेत्रावर पर्यटकांची आणि भाविकांची मोठी गर्दी असते.

### ठाण्यात २६ वृक्षांची बेकायदा तोड

**ठाणे :** टिकुजिनीवाडी येथे महादेव मंदिराजवळील भूखंडावर २६ वृक्षांची बेकायदा तोड केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी ठाणे महापालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाने संबंधित ठेकेदार व विकसकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.ठामपा उद्यान निरीक्षक डॉ. राहुल दुरगुडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बुधवारी (दि.८) वृक्षतोडीबाबत माहिती मिळाल्यानंतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. त्या वेळी जेसीबीच्या साहाय्याने वृक्षतोड सुरू असल्याचे निदर्शनास आले. गुरुवारी (दि.९) पुन्हा तपासणी केली असता त्या भूखंडावरील विविध प्रकारचे २६ वृक्ष तोडल्याचे स्पष्ट झाले. याबाबत कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. याप्रकरणी जेसीबी ठेकेदार विशाल कदम तसेच भूखंड मालक, विकसक अविनाश तांगडी व कपील शर्मा यांच्यावर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेने या प्रकाराची गंभीर दखल घेतली असून पुढील तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

### गुटखा नष्ट केल्यानंतर धाडसी चोरी

**भिवंडी :** भिवंडी शहरातील कचरा चाविंद्रा येथील डम्पिंग ग्राउंडवर टाकण्यात येतो. येथे पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाकडून जप्त केलेला गुटखा नष्ट करण्याची कारवाई करण्यात आली. जप्त केलेला ६४ लाखांचा गुटखा पुन्हा गुटखा माफियांकडून खड्ड्यातून चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही सर्व घटना तेथील स्थानिक नागरिकांनी उघडकीस आणली; पण अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीही कारवाई झाली नसल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन महिन्यांपूर्वी भिवंडी गुन्हे शाखेने मोठी कारवाई करीत सुमारे ६४ लाखांचा गुटखा जप्त केला होता. न्यायालयाच्या परवानगीनंतर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा गुटखा चाविंद्रा डम्पिंग ग्राउंड येथे वीस ते पंचवीस फूट खोल खड्ड्यात गाडून नष्ट करण्याची कारवाई शुक्रवारी (दि.१०) दुपारच्या सुमारास करण्यात आली; मात्र ही प्रक्रिया पूर्ण होताच गुटखा माफियांकडून त्याच मध्यरात्री जेसीबीच्या मदतीने खड्डा उकरून मोठ्या प्रमाणात गुटखा पुन्हा बाहेर काढला आणि टेम्पोमध्ये भरून नेण्यात आला. स्थानिकांच्या लक्षात येताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत गुटखा माफियांना अडवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या घटनेची पोलिसांना माहिती दिली. पोलीस येत असल्याचे कळताच गुटख्याने भरलेला टेम्पो सोडून गुटखा माफिया त्या ठिकाणाहून पसार झाले.

### रेल्वे रुळामध्ये तांत्रिक बदल

**मुंबई :** रेल्वे रूळ अधिक सुरक्षित आणि टिकाऊ करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने महत्त्वाचे तांत्रिक बदल जाहीर केले आहेत. ब्रिज ॲप्रोच तसेच पॉइंट्स अँड क्रॉसिंग्ज भागात आता आधुनिक कम्पोझिट स्लीपर्स वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सध्या वापरात असलेल्या काँक्रीट आणि लोखंडी स्लीपर्सच्या तुलनेत कम्पोझिट स्लीपर्स हलके असून, अधिक भार सहन करण्यास सक्षम आहेत. त्यांचे कुशनिंगही अधिक प्रभावी असल्याने गाड्या धावतानाचे धक्के कमी होतील. परिणामी प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. तसेच हे स्लीपर्स बसविणे आणि दुरुस्ती करणे सोपे असल्याने देखभाल खर्चातही बचत होणार आहे. विशेष म्हणजे पूल आणि क्रॉसिंग परिसरातील तांत्रिक गरजेनुसार या स्लीपर्सची रचना करता येणार आहे. त्यामुळे ट्रॅकची स्थिरता वाढण्यास मदत होईल. रेल भवन, नवी दिल्ली येथे झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हे स्लीपर्स प्रति चौरस सेंटीमीटर सुमारे ७०० किलोपर्यंत भार सहन करू शकतात, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ट्रॅक देखरेख अधिक अचूक करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. तपासणी वाहनांमध्ये एआयआधारित यंत्रणा बसवून ग्राउंड पेनिट्रेशन रडारच्या सहाय्याने रुळांच्या पायाभूत स्थितीची तपासणी केली जाणार आहे. याशिवाय रुळांवरील वेल्डिंगची गुणवत्ता तपासण्यासाठी मॅग्नेटिक पार्टिकल टेस्टिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. या पद्धतीमुळे वेल्डिंगमधील सूक्ष्म दोष लवकर ओळखता येणार असून, रेल्वे सुरक्षिततेत आणखी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

### मुरुडमध्ये चैत्रगौरी हळदी-कुंकू

**कोर्लई :** मुरुडमध्ये चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्ट अंतर्गत स्नेह प्रभा महिला मंडळातर्फे चैत्रगौरी हळदी कुंकू समारंभ श्री लक्ष्मी नारायण मंदिरात आयोजित करण्यात आला होता. यावेळी सुरुवातीला स्नेहप्रभा महिला मंडळाच्या अध्यक्षा जयश्री प्रधान यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन वसुधा मथुरे यांनी श्रीलक्ष्मीची ओटी भरुन,सर्व उपस्थित महिलांनी श्रीलक्ष्मी नारायण दैवतांची पूजा–प्रार्थना करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली तर सचिव साक्षी नागले यांनी मागील कार्यक्रमाचा अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे औचित्य साधून जयश्री प्रधान व नैनिता कर्णिक यांना नगरपरिषदे तर्फे हिरकणी पुरस्कार मिळाल्याबद्दल स्नेहप्रभा महिला मंडळाच्या वतीने प्रतिभा मोहिले, नलिनी कुळकर्णी, नूतन कारखानीस, कल्पना मथुरे, भारती मथुरे, विलासिनी चिटणीस, सुषमा पोतनीस, सुप्रिया मथुरे, साधना सबनीस यांच्याहस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. उपाध्यक्षा सुचिता पोतनीस यांनी आपल्या मनोगतात सत्कारार्थी समाज अध्यक्षा नैनिता कर्णिक, स्नेहप्रभा महिला अध्यक्षा जयश्री प्रधान यांच्या सहकार्याचे ऋण निर्देशितेबद्दल कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिपा सबनीस, भारती मथुरे, अनुष्का दिघे, अनन्या मथुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## निवडक

### श्री हनुमान मंदिराचा जीर्णोध्दार सोहळा

**माणगाव** : कोशिंबळे तर्फे तळे येथील श्री हनुमान मंदिराचा जिर्णोध्दार व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे उद्घाटन शनिवारी (दि.११) सायंकाळी ५:३० वा. रायगड - रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी उपस्थितांना खा.तटकरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते महादेवराव खेळू बक्कम उपस्थित होते. तसेच यावेळी ज्येष्ठ नेते शेखर देशमुख, ज्येष्ठ नेते हुसेन रहाटवीलकर, महादेव चंद्रकांत बक्कम, राजिप सदस्य अस्लम राऊत, जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष काका नवगणे, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक सचिव दिपक जाधव, माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे, पंचायत समिती सदस्या संगीत बक्कम, जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष उदय अधिकारी, माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, सरपंच ऋतिका गायकवाड, वारक सरपंच वैष्णव साठे, गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश मालोरे, दिनेश गुगले, सहदेव बक्कम, महेश महाजन, बाळकृष्ण बेंडखळे, विनोद बागडे, संजय बक्कम, सौरभ बक्कम, प्रकाश धुमाळ, राजेंद्र जाधव, धोंडू बक्कम, सखाराम जाधव, रमेश बक्कम आदींसह कोशिंबळे तर्फे तळे येथील ग्रामस्थ बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोहपाडा येथे हिंदू संमेलनाचे आयोजन

**रसायनी** : येथे हिंदू संमेलनाचे आयोजन रसायनी मोहपाडा येथील सकल हिंदू समाज यांच्या वतीने धर्माचा अभिमान व समाजातील एकोप्यासाठी मोहपाडा येथील जनता विद्यालयाच्या मैदानावर हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. या हिंदू संमेलनाला सहकार्यवाहक राष्ट्रीय स्वयंसक संघाचे श्रीकृष्ण गोपाल यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. वामन भोईर व सच्चिदानंद कांबेकर यांची विशेष उपस्थिती होती. परिसरातील सर्व हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने या हिंदू संमेलनाला हजेरी लावली होती.



### करारानुसार कामगारांना मिळणार सवलती

**उरण** : भेंडखळ येथे पोलीरीस कंपनीत समर्थ रायगड जनरल कामगार संघटने अंतर्गत कार्यरत असणारे इलेक्ट्रिशन व मेंटेनन्सचे काम करणारे कर्मचारी कार्यरत असून या कंपनीत समर्थ रायगड जनरल कामगार संघटना व जीएमसी मेंटेनन्स वर्क एल एल पी यांच्यात वेतन वाढीचा यशस्वी संपन्न झाला. या करारा अंतर्गत कामगारांना तीन वर्षासाठी प्रति महिना प्रति व्यक्ती ६२५० रुपये इतकी वेतन वाढ करण्यात आली आहे. तसेच पगारवाढी सोबत बोनस व इतर सेवा सुविधा जसे की रजा, सुरक्षा साहित्य, युनियनची देणी, थकबाकी आदी सुविधा कामगारांना मिळणार आहेत. या करारा प्रसंगी समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल भगत, युनियन लीडर नैनेश म्हात्रे, किशोर बनसोडे, जीएमसीचे मालक इरफान पटेल, ऍडमिन ऑफिसर अरुण माने, चिटणीस अजय पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. या करारामुळे कामगार वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून कामगारांनी समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेचे तसेच जीएमसी मालक इरफान पटेल,पोलीरिस कंपनी प्रशासनाचे आभार मानले आहेत. समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून हे यशस्वी करार संपन्न झाल्याने कार्याचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

### दारू गुत्त्यांमुळे अपघातात वाढ

**पनवेल** : रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी चक्क मुंबई-गोवा हायवेवर रात्री-अपरात्री अनाधिकृत दारू विक्री केंद्र फोफावल्याने या मार्गावर वाहनांच्या अपघातात लक्षणीय वाढ होऊन निष्पाप नागरीकांचे जीव जात असल्याचे समोर येत आहे. नुकताच रात्री तीनच्या सुमारास नागोठणे जवळील सुकेळी खिंडीत झालेल्या भीषण अपघातात २ निष्पाप नागरिकांचा जीव जाऊन सुमारे ३८ जण गंभीर जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली आहे.

ट्रॅव्हल्स कंपनीने देखील पर्यायी बदली चालक देण्यास बगल दिल्याने नागोठणे येथे जेवण आटोपुन सदर चालक पुन्हा स्टेरींगवर बसला व थोड्या फर्लांगावर जात नाही तर चालक मद्यधुंद असल्याने सदर ट्रॅव्हल्स बस सुकेळी खिंडीत रात्री पलटी होऊन दोन मृत्युमुखी होऊन सुमारे ३८ प्रवासी गंभीर जखमी झाले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- झिराड आणि मांडवा येथील दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- बागायती वाडी विक्री १३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- ३५ गुंठे शेत जमीन विकणे आहे. मौजे कावीर-गरुडपाडा. बोअरवेल आणि इलेक्ट्रीक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क ९८६७५३०७२७
- अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकानगाळा व अलिबागपासून दोन तीन कि.मी. अंतरावर रोडटच एकर जागा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर,रेस्टॉरंट कॅप्टन, हाऊसकिपिंग सुपरवायझर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅपवर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- वरसोली आदर्शनगर येथे ५.७५ गुंठे एन. ए. प्लॉट विकणे आहे. हवेशीर दोन्ही बाजूने रस्ता, बंगला फार्महाऊसकरिता उत्तम लाईट पाणी जवळच उपलब्ध. किंमत २७ लाख गुंठा. एजंट क्षमस्व. फोन- ७०३०२११५५५
- नवीन बांधकाम चालू असलेल्या बिल्डिंग मध्ये 1BHK फ्लॅट (sqft - ६४२) विकणे आहे. श्री स्वामी समर्थ नगर पिंपळभाट अलिबाग संपर्क : ९८८१३७१४०७
- 1 BHK ब्लॉक भाड्याने उपलब्ध. सेंट मेरी स्कूलसमोर चेंढरे-अलिबाग, मो. ७६६६१२६८४४, ८४२११६३२५५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रोह्यात प्रीपेड मीटरला नागरिकांचा विरोध

## सर्वसामान्यांच्या प्रश्नासंदर्भात लोकप्रतिनिधीचे भाष्य नाही; नागरिकांना पडला प्रश्न

| धाटाव | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील वीज वितरण कंपनीने वीज ग्राहकांना प्रीपेड मीटर बसवण्याचा धडाका सुरू केला आहे. कोणी म्हणतोय शासनाच्या जीआर नाही, तर अधिकारी म्हणतात शासनाची परवानगी आहे. नेमकं गौड बंगाल काय हे समजू शकले नाही.प्रीपेड मीटर मुळे भविष्यात सर्वसामान्य नागरिक यांना मूलभूत गरज असलेली वीज परवडणार नसल्याचे बोलले जात आहे.या प्रीपेड मीटरमुळे सर्वसामान्यांचे जीवनमान अंधारमय होणार असल्याचे बोलले जाते.याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत कुठलेही भाष्य करताना दिसत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.




महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की,आम्ही कुठला मीटर संदर्भात जीआर काढला काढला नाही. मग सदर मीटर हुकूमशाहीने कोणाच्या सांगण्याने बसवली जातात? असा आरोप होत आहे.आपला देश लोकशाही प्रधान देश असे म्हणतात लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य याचा अर्थ आहे. परंतु सध्याची परिस्थिती इतकी भयानक आहे की या देशावर अंबानी,आदानीच राज्य येईल की काय? अशी चिंता सामान्याला पडली आहे. विधानसभा व संसदेतील आमदार खासदारांची परिस्थिती ही सुस्तावलेल्या अजगरासारखी झाल्याची तिखट प्रतिक्रिया शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष तुषार खारिवले यांनी व्यक्त केली.

अन्न,वस्त्र, निवाराप्रमाणे वीज ही सर्वसामान्यांची गरज बनली आहे. मात्र वीजवितरण कंपनी नागरिकांना कुठल्याही सुविधा न देता फक्त लाईट बिल वसुलीचे काम करीत आहेत. भरमसाठ वाढलेली बिले व बिलामधील अतिरिक्त आकार यांनी सामान्य माणूस मेटाकुटीला आला आहे. पूर्वी तीन महिन्यांनी साधारणता ३०० ते ४०० रुपये बिल येत असत. ते बिल आता एक महिन्याला १५०० ते २००० येत आहे. घरात कुटुंबासाठी जेवढा किराणा लागत नाही. तेवढा विज बिल भरावा लागतो. ज्यांच्याकडे पैसा अडका आहे. जे साहेब, भाऊचे, भाईंचे, ताईचे आहेत त्यांना फारशी झळ बसणार नाही. मात्र सामान्य नागरिकाला याचा खूप मोठा फटका बसत आहे. वितरण कंपनीचा रोहा तालुक्यात तर खूपच सावला गोंधळ सुरू आहे. कोलाडमध्ये तर रात्री अपरात्री वीज कर्मचारीच नसतात.समोरील गेटला चक्क लॉक केलेले असते.यावर हे काय अधिकाऱ्यांची प्रायव्हेट प्रॉपर्टी आहे का? असा संतप्त सवाल होत आहे. नेत्यांच्या सध्याच्या ढासलेल्या बालेकिल्ल्यात असा प्रकार होत असेल तर डोंगर दऱ्यातल्या लोकांचे काय असे बोलले जाते.

जर बिल भरण्याची मुदत संपली तर ताबडतोब वीज बंद होणार आहे. त्यामुळे एखाद्या गरीबकडे पैसे नसतील तर त्याला अंधारात राहावे लागणार आहे. वितरण अधिकारी सत्ताधीशांची मर्जी राखतात त्यामुळे इथले लोकप्रतिनिधी सामान्यांच्या प्रश्नासाठी गप्प असतात. केवळ विजेचाच प्रश्न नव्हे तर शेतकऱ्यांचे कामगारांचे शोषित वंचितांचे असे वर्षानुवर्षाचे असंख्य प्रश्न आहेत जे इथल्या नेत्यांनी सत्तेवर बसल्यापासून केले नाहीत त्यामुळे लोकांमध्ये एक चिड निर्माण झाली आहे. लवकरच सामाजिक संघटना शरद पवार गट प्रीपेड मीटर विरोधात आवाज उठवणार आहे, अशी माहिती रोहा तालुका शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष तुषार खरीवले यांनी दिली.

## माजी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना करिअरची नवी दिशा



| अलिबाग | प्रतिनिधी |

जनता शिक्षण मंडळाचे ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ, अलिबाग येथील आय.क्यू.ए.सी. आणि करिअर गाईडन्स सेल तसेच अल्युमनी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यशस्वी माजी विद्यार्थ्यांसह संवाद हा कार्यक्रम जयवंत केळूसकर सभागृह येथे उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरलेल्या या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि त्यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी, असा संदेश देण्यात आला.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील आणि उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. नीलम हजारे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या अनुभवातून प्रेरणा घेऊन आपल्या करिअरची दिशा निश्चित करावी आणि स्पर्धात्मक युगात आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन केले. या प्रसंगी माजी विद्यार्थी सनदी लेखापाल प्रज्ञा शिरधणकर, ॲड. सौरभ पाटील आणि राकेश सावंत यांनी आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक अनुभवांद्वारे विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.त्यांनी टॅक्स आणि कायदा यांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना कायदेशीर भाषा, कायद्याचा अर्थ लावणे, बेअर ॲक्ट वाचणे तसेच सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे पूर्वनिर्णय अभ्यासणे हे विधी शिक्षणासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांनी कायद्यातील संज्ञांचे अचूक अर्थ समजून घेणे आणि विविध कायदे व अधिनियमांतील कलमांचा सखोल अभ्यास करणे हे यशस्वी विधीज्ञ होण्यासाठी आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. तसेच ड्राफ्टिंग आणि प्रभावी सादरीकरण कौशल्ये विकसित करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

# वावोशी फाट्यावरील रस्त्यावर महानगर गॅसलाईनच काम सुरू

## सुरक्षेची व्यवस्था नसल्यामुळे अपघाताची शक्यता

| खोपोली | प्रतिनिधी |

पेण - खोपोली रस्त्यावरील वावोशी फाट्यावरून महानगर गॅसलाईनचे काम रस्त्याच्या कडेलाच सुरू आहे. याठिकाणी मोठे खड्डा केला असून सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिगेट आणि सुरक्षेची व्यवस्था नसल्यामुळे खड्ड्यात पडून अपघाताची शक्यता आहे.



रस्त्याचा काही अंतर सोडून खोदकाम केलं पाहिजे परंतु सर्व नियम ढाब्यावर बसवून रस्त्याच्या कडेलाच पाईपलाइन टाकली जात आहे. खोदकाम केल्यानंतर रस्त्याच्या बाजूला बॅरिगेट लावले नसल्यामुळे अपघात घडण्याची शक्यता आहे.तसेच वावोशी फाट्यावर मोठी बाजारपेठ असल्यामुळे बाजारहाटासाठी छत्तीशी विभागातून महिला अबावृध्द येत आहेत.शाळकरी मुलेही पायी याठिकाणी शाळेत जातात.वावोशी फाट्यावर एका दुकाणासमोरच खड्डा करून गॅसलाईन टाकण्याचा धक्कादायक प्रकार सुरू आहे.

रस्त्याच्या अगदी कडेलाच गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असल्याने भविष्यात महानगर गॅसलाईन गळतीमुळे मोठा अनर्थ घडू शकतो, अशी चिंता स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहे.

परंतु संबंधित ठेकेदार,एजन्सी नियम ढाब्यावर बसवून काम करीत असल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

## नवीन उपक्रमातून नागरिकांच्या तक्रारींना मिळणार थेट न्याय

### अरविंद म्हात्रे यांनी बसवली पालिकेबाहेर तक्रारपेटी

| पनवेल | प्रतिनिधी |

पालिकेतील नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी अनोखा उपक्रम सुरू केला आहे. नागरिकांना त्यांच्या अडचणी थेट मांडता याव्यात यासाठी महापालिका कार्यालयाबाहेर तक्रारपेटी उभारण्यात आली आहे.

या तक्रारपेटीत नागरिकांना रस्ते, पाणी, कचरा, मालमत्ता कर, बांधकाम परवानग्या तसेच शासकीय कामकाजातील अडथळे यांसारख्या विविध विषयांवरील तक्रारी लेखी स्वरूपात नोंदवता येणार आहेत. विशेष म्हणजे, तक्रारदारांची ओळख गुप्त ठेवण्याची सोय केली आहे.

दर आठवड्याला ही तक्रारपेटी उघडून त्यातील सर्व तक्रारींचा आढावा घेतला जाणार असून, गंभीर आणि तातडीच्या तक्रारी थेट महापालिका आयुक्त व संबंधित विभागप्रमुखांकडे लेखी स्वरूपात पाठवण्यात येणार आहेत.

महापालिका प्रशासनापर्यंत सर्वसामान्य नागरिकांचा आवाज पोहोचत नसल्याची भावना लक्षात घेऊन हा उपक्रम राबवण्यात येत आहे. अनेक वेळा नागरिकांच्या तक्रारी दाबल्या जातात किंवा त्यावर योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे नागरिकांना आपली मते निर्भयपणे मांडण्यासाठी ही तक्रारपेटी प्रभावी व्यासपीठ ठरणार असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे नागरिकांच्या समस्या जलद गतीने मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## डेंग्यूसाठी फॉगिंगची मागणी

पनवेल: डेंग्यू व मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर परेशा ब्रिजेश पटेल यांनी पनवेल महानगरपालिकेकडे तातडीने फॉगिंग करण्याची मागणी केली आहे.पटेल यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, प्रभागातील सेक्टर १२, २०, २१, २३ व २४ या भागांत मोठ्या प्रमाणावर डासांची उत्पत्ती वाढली आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता संबंधित विभागामार्फत तात्काळ फॉगिंग करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांना डासांपासून दिलासा मिळेल व आजारांचा प्रसार रोखता येईल, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## सिमेंटच्या इमारतीमुळे चिमण्यांचा चिवचिवाट बंद!

| आगरदांडा | प्रतिनिधी |

विकासाच्या नावाखाली शहरांमध्ये झपाट्याने उभी होत असलेल्या सिमेंटच्या इमारती त्यात वाढती लोकसंख्या मुळे चिमण्यांची घरटी दिसेनाशी झाली आहेत.



शहरात माणसाच्या घराजवळ घरटी बांधण्यासाठी चिमण्यांना जागाच उरलेली नसल्याने सकाळ व सायंकाळच्या दरम्यान चिमण्यांचा चिवचिवाट येणारा आवाज बंद होत असल्याने पक्षीप्रेमीमध्ये चिंता पसरली आहे.

चिमण्या नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या पक्ष्याला प्रत्येक शहरातील नागरिकांना चिमण्यांना जीवदान देण्यासाठी आपापल्या घराबाहेर किंवा परिसरात असलेल्या झाडांवर कृत्रिम घरटी अशी तयार करावीत ती पावासाळ्यात ही टिकुन राहतील.तसेच रोज त्यांना प्रत्येकाने दाणा-पाणी द्यावे जेणेकरून चिमणी स्थलांतर होणार नाही, अशी अपेक्षा पक्षीप्रेमी करित आहेत.

ग्रामीण भागात अजुनही कवलारु घरे आहेत त्यामुळे चिमण्या ग्रामीण भागात थोड्या फार दिसत आहेत. त्यामुळे त्यांचे अस्तित्व तरी टिकून आहे.शहरात चिमण्यांसाठी जागाच नाही, असं सध्या तरी दिसुन येत आहे.

## युवा प्रवक्तापदी दिपक पाटील

**रसायनी** : चौक वावर्ले येथील कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिपक पाटील यांचा देशभरातील जनसंपर्क व सामाजिक कार्यांची दखल घेऊन त्यांची अखिल भारतीय कुर्मि क्षत्रिय महासभेच्या



राष्ट्रीय युवा प्रवक्ता पदी दिपक पाटील यांची निवड करण्यात आली आहे. याबाबत दिपक पाटील यांना अखिल भारतीय कुर्मि क्षत्रिय महासभेचे महासचिव डॉ. उमेश कुमार पटेल यांनी नियुक्तीचे आदेश पत्र दिले आहे. दिपक पाटील यांची राष्ट्रीय युवा प्रवक्ता पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संभे शाळेचा रंगरंगोटीने केला कायापालट



| कोलाड | वार्ताहर |

रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संभे येथील शाळेत प्रशांत सानप यांच्या प्रयत्नातून व पोस्को एमआयडीसी तसेच कारवान रोडव्हेज प्रा.लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या एका वर्गखोलीला पीओपी, पूर्ण शाळेला रंगरंगोटी, तसेच एज्युकेशन ऑल पेटिंग करून सुशोभीकरण करण्यात आले.

जागतिक स्तरावर उद्योग व्यवसायात नामांकित असलेल्या पोस्को एमआयडीसी यांच्या सौजन्याने पीओपी व रंगरंगोटी करून शाळेचे पूर्णपणे पालटले आहे.

याचे उद्घाटन कोरियन व्यवस्थापक एम. डी. मंकीचून, जी.एम डॉग हुकॉन, कारवान कंपनीचे मॅनेजर हरिकेश शर्मा, तसेच सुधीर भोसले सिनियर मॅनेजर पोस्को एमआयडीसी, संभे ग्रामपंचायत उपसरपंच राजेश्री सानप, पोलीस पाटील अनंत सानप, पांडुरंग सानप, देविदास सानप, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा जुईली दहिंबेकर, नारायण दहिंबेकर, मनोहर सानप, सागर दहिंबेकर, अंगणवाडी सेविका संगिता सानप मदतनीस सुरेखा सानप व असंख्य पालक वर्ग यांच्या उपस्थित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या मुख्यध्यापिका प्रिया पवार यांनी केले तर उपशिक्षिका रेश्मा जमादार यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल | एसटीकडून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा

# मोफत प्रवासासोबत डिजिटल एनसीएमसी कार्ड

| रायगड | प्रतिनिधी |

परिवहन महामंडळाने सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेतला असून, त्यांच्या मोफत प्रवास सवलतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. पारंपरिक पास प्रणालीऐवजी आता रुपे ऑन द गो सक्षम राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड प्रणालीचा अवलंब करण्यात येणार असून, यामुळे प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल होणार आहे.

एसटी महामंडळातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह त्यांच्या पत्नीच्या मोफत प्रवास सवलतीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, सेवानिवृत्त कर्मचारी, तसेच अपघातग्रस्त किंवा निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पत्नी/पतींनाही एप्रिल २०२६ पासून वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा मिळणार आहे. एसटीच्या विविध बससेवांमधून प्रवास करताना केवळ नाममात्र फरकाची रक्कम भरून ही सवलत मिळवता येणार आहे.

एनसीएमसी कार्डची नोंदणी व वितरण प्रक्रिया राज्यभरातील आगारांमध्ये अधिकृत दलालामार्फत राबवली जाणार



असून, ही यंत्रणा एनएसडीएल पेमेंट बँकेच्या माध्यमातून कार्यान्वित केली जाईल. या डिजिटल कार्डमुळे प्रवाशांची ओळख पटवणे, सवलतींचा वापर आणि व्यवहार प्रक्रिया अधिक वेगवान व सोपी होणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे, भविष्यात मोफत प्रवासाचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी वेळेत नोंदणी करून या डिजिटल प्रणालीचा स्वीकार करणे आवश्यक ठरणार आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार, मोफत प्रवास पास प्रणाली अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याचा हा प्रयत्न आहे. सामाजिक बांधिलकी जपत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा देतानाच डिजिटल व्यवहार प्रणालीचा प्रसार करण्याचे दुहेरी उद्दिष्ट या निर्णयातून स्पष्ट होत आहे. या उपक्रमामुळे एसटी महामंडळ केवळ प्रवासी सेवा देणारी संस्था न राहता, आपल्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणाचा विचार करणारी आणि आधुनिक बदल स्वीकारणारी सक्षम संस्था म्हणून पुढे येत असल्याचे अधोरेखित झाले आहे, असे एसटी महामंडळाद्वारे सांगण्यात आले.

# इन्फ्लुएन्सरचा पोलिसांनी उतरवला माज

## स्वस्त प्रसिद्धीसाठी रचलेला लूटमारीचा बनाव उघड, सोशल मीडिया स्टंटबाजी भोवली; मुकुल साबळेवर गुन्हा दाखल

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

कोकणातील निसर्गरम्य आणि सुरक्षित पर्यटन स्थळ म्हणून ओळख असलेल्या श्रीवर्धन शहराची सोशल मीडियाच्या माध्यमातून जाणीवपूर्वक बदनामी करणाऱ्या एका तथाकथित इन्फ्लुएसरवर श्रीवर्धन पोलिसांनी कायदेशीर बडगा उगारला आहे.

केवळ सोशल मीडियावर व्ह्यूजचा पाऊस पाडण्यासाठी आणि फॉलोअर्स वाढवण्यासाठी कोणत्याही थराला जाणाऱ्या आधुनिक स्टंटबाजांना श्रीवर्धन पोलिसांनी जोरदार दणका दिला आहे. निसर्गरम्य श्रीवर्धनची सुरक्षित पर्यटन स्थळ ही प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने स्थानिक तरुणांनी लूटमार केली, असा खोटा व्हिडिओ प्रसारित करणाऱ्या मुकुल साबळे याच्यावर श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पर्यटनाच्या नावाखाली शहराची बदनामी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुकुल साबळे याने त्याच्या ‘mukulsable01’ या इंस्टाग्राम आणि फेसबुक हँडलवरून एक खळबळजनक व्हिडिओ पोस्ट केला होता. हा व्हिडिओ पेड प्रमोशन स्वरूपाचा असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या व्हिडिओमध्ये त्याने असा बनाव रचला होता की, श्रीरामपूर येथील टाकळी भान गावातील काही तरुण श्रीवर्धनला



फिरायला आले असता, त्यांना आंब्या चोरीच्या खोट्या आरोपावरून अडवण्यात आले. त्यानंतर श्रीवर्धनमधील स्थानिक तरुणांनी त्यांना मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि रोख रक्कम लुटली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरल्याने श्रीवर्धनच्या पर्यटनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते.

या व्हिडिओमुळे शहरात संतापाची लाट उसळली होती. स्थानिक जागरूक नागरिक निलेश अनंत कर्णेकर यांनी याप्रकरणी तातडीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली. श्रीवर्धन पोलिसांनी या तक्रारीची दखल घेऊन तांत्रिक तपास केला असता, व्हिडिओमधील सर्व दावे पूर्णतः कपोलकल्पित आणि बनावट असल्याचे सिद्ध झाले. श्रीवर्धनमध्ये अशा प्रकारची कोणतीही लूटमार किंवा मारहाणीची घटना घडली नव्हती. केवळ मकन्टेन्टफ व्हायरल करण्यासाठी आणि शहराची बदनामी करण्यासाठी हा संपूर्ण स्टंट रचला गेल्याचे तपासात निष्पन्न झाले.

श्रीवर्धन पोलिसांनी या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून मुकुल साबळे याच्यावर बदनामीचा गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल गायकवाड करत आहेत. अशा प्रकारे चुकीच्या माहितीच्या आधारे सामाजिक शांतता धोक्यात आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

श्रीवर्धनची अर्थव्यवस्था प्रामुख्याने पर्यटनावर अवलंबून आहे. येथील शेकडो हॉटेल व्यावसायिक, होमस्टे मालक, रिक्षा चालक आणि छोटे व्यावसायिक पर्यटकांच्या भरवशावर आपली उपजीविका चालवतात. अशा खोट्या आणि भीतीदायक व्हिडिओंमुळे पर्यटकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. स्वार्थासाठी एका शहराची आणि येथील हजारो कष्टकरी लोकांची बदनामी करणे हा अक्षम्य गुन्हा आहे, अशी भावना स्थानिक व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे.

श्रीवर्धन हे नेहमीच पर्यटकांच्या सुरक्षेसाठी आणि कोकणी आदरातिथ्यासाठी ओळखले जाते. कोणताही पर्यटक येथे निर्धास्तपणे फिरू शकतो. त्यामुळे सोशल मीडियावरील अशा कोणत्याही फेक व्हिडिओंवर किंवा अफवांवर विश्वास न ठेवता पर्यटकांनी श्रीवर्धनला भेट द्यावी, असे आवाहन स्थानिक प्रशासन आणि रहिवाशांनी केले आहे.

# महसूल अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवर बंधन

**रायगड:** महसूल विभागातील राजपत्रित अधिकारी वारंवार आणि दीर्घकाळ इतर विभाग किंवा महामंडळांमध्ये प्रतिनियुक्तीवर जात असल्याने मूळ विभागातील कामकाजावर परिणाम होतो. यापुढे महसूल विभागातील अधिकाऱ्याला एकदा प्रतिनियुक्ती पूर्ण केल्यानंतर पुन्हा प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी मूळ विभागात किमान ३ वर्षे सेवा देणे बंधनकारक असणार आहे.

महसूल, नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक आणि भूमी अभिलेख यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या उपविभागांतील अधिकारी मोठ्या प्रमाणात प्रतिनियुक्तीवर जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. वरिष्ठ स्तरावरील पदे रिक्त राहिल्याने सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर त्याचा थेट परिणाम होतो आणि प्रशासकीय कामकाज विस्कळीत होते. ही परिस्थिती सुधारण्यासाठी महसूल विभागाने नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. प्रतिनियुक्ती संपल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याने मूळ विभागात किमान ३ वर्षे काम करणे आवश्यक आहे.


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




# महाड येथे समाधान शिबीर

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड महसूल विभागाच्या वतीने महाड येथील करंजाडी या महसूल मंडल विभागामध्ये महाराष्ट्र शासनाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न झाले.

यावेळी विविध दाखल्यांचे सातबारा यांचे व नागरिकांच्या विविध योजनांचे अर्ज स्वीकारण्यात आले महाडचे सभापती प्रेरणा सावंत व तहसीलदार महेश शितोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान संपन्न झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी घेतलेल्या जनहित निर्णयाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर शुक्रवारी (दि. १०) महाड महसूल वतीने करंजाडी विन्हेरे या मंडल विभागात घेण्यात आले.

यावेळी नागरिकांना उत्पन्नाचे दाखले, अधिवास दाखले, तसेच विविध शालेय संबंधित दाखले, जन्म मृत्यूचे दाखले, रहिवासी दाखले, आधार कार्ड शिधापत्रिका तसेच विद्यार्थ्यांचे विविध दाखले प्रत्यक्ष शाळांमधून जाऊन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

तसेच शेतकऱ्यांना सातबारे उतारे, पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना व इतर सर्व योजनांचे अर्ज या अभियानात दाखल करून घेण्यात आले. तसेच यावेळी कृषी विभागाच्या वतीने गरजू शेतकऱ्यांना दोन ट्रॅक्टर व शेती अवजारांची वाटप करण्यात आले.

याप्रसंगी महाड पंचायत समितीच्या सभापती प्रेरणा सावंत, जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे, उपसभापती सुरेश महाडिक, तहसीलदार महेश शितोळे उपस्थित होते. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी तालुका भूमिलेख विभागाचे माने, मंडल अधिकारी वंदना गिमेकर व महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# ‘वन व्यवस्थापन समितीने आर्थिक स्रोतावर लक्ष केंद्रित करा’

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानच्या पर्यटनास,तसेच वनखात्याच्या अखत्यारीत येणाऱ्या पर्यावरणीय दृष्ट्या महत्वपूर्ण कामांसाठी सहकार्य करण्याची महत्वाची भूमिका संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पार पडत असते. या समिती मधील सर्वच सदस्यांची निवड दर पाच वर्षांनी नगरपरिषदेतील सत्ताधारी गटाच्या माध्यमातून केली जाते. या समितीवर वनपाल हे सचिवांची जबाबदारी घेत असून सत्ताधारी गटाच्या मर्जीतील अध्यक्ष आणि कार्यकारी सदस्यांची नियुक्ती करण्यात येते.

समितीला दस्तुरी वाहन करांच्या आकारणी मधून भरघोस उत्पन्न प्राप्त होत असते. याच एकमेव मुख्य आर्थिक स्रोतावर सर्व विकास कामे



पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत मिळते. दस्तुरी नाक्यावर सुयोग्य पद्धतीने वाहनांच्या पार्किंगची सुविधा येणाऱ्या पर्यटकांना दिल्यास वाहनांची कोंडी न होता अधिक मोटार गाडया पार्क करता येऊ शकतात.त्याचप्रमाणे समितीचे अध्यक्ष आणि पदाधिकारी, सदस्यांनी दस्तुरी नाक्यावर होणाऱ्या वाहन पार्किंग वसुली वर बारकाईने लक्ष केंद्रित केल्यास आणखीन मोठ्या प्रमाणावर उत्पन्नात वाढ होऊ शकते.

त्यासाठी सर्व सदस्यांनी आपला अमुल्य वेळ देणे गरजेचे असल्याचे मत माजी अध्यक्ष योगेश जाधव यांनी व्यक्त केले आहे. नुकताच योगेश जाधव यांनी कार्यकाळ पूर्ण झाल्यावर स्वखुशीने आपल्या पदाचा राजीनामा वरिष्ठांकडे सुपूर्द केला आहे.

त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक सेवाभावी उपक्रम राबविले असून समितीच्या फायद्यासाठी पार्किंगमध्ये कामगारांना पुरेसे मानधन देऊन उत्तम प्रकारे वाहन पद्धतीने केल्यामुळे आजच्या घडीला जवळपास सत्तर लाख रुपयांची जमा आहे.

> **“पार्किंग वसुली चांगल्या दस्तुरी नाक्यावर एअरपोर्ट प्रमाणे सुसज्ञ व चांगली व्होलेट पार्किंग होणे गरजेचे आहे.फास्ट टॅग सुविधा उपलब्ध केल्यास पार्किंग वसुलीमध्ये सुसूत्रता येऊन थेट खात्यामध्ये वाहन करांची रक्कम जमा होईल.बस स्टॅन्ड जवळच मधोमध केबिन करून दोन्ही बाजूनी इन आऊटची सुविधा केल्यास वाहनाची कोंडी होणारं नाही. नवीन समितीने ह्या बदलाकडे अवश्य लक्ष द्यावे.”**
>
> **योगेश जाधव, माजी अध्यक्ष वन व्यवस्थापन समिती माथेरान**

# तळा तालुक्यात जल्लोषात साजरी होणार भीमजयंती

**तळा** : तळा तालुक्यात जल्लोषात भीम जयंती साजरी करण्यात येणार असून भीम अनुयायांकडून महापुरुषांच्या जयंतीची जय्यत तयारी करण्यात आली आहे. बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा, दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मंगळवारी (दि.१४) आयोजित करण्यात आली आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा - रायगड, पोटतुकडी व तालुका रोहा, यांचे हद्दीतील मौजे - बाहेरशिव, ता. रोहा, जिल्हा. रायगड यांचे हद्दीतील शेतजमीन मिळकत आमचे आशिल श्री. जगदिश हरिभाऊ पाटील, रा. ओवळे, पो. पारगांव, जि. रायगड यांनी विकत घेण्यासाठी, मिळकतीचे विद्यमान मालक यांचे बरोबर वाटाघाटी केल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

| गट नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२०/अ | ०-३१-३० | ६.५१ | श्री. नारायण पांडुरंग जोशी वैगरे |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकरार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, डिक्री, तारण, गहान, जाणे-येणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी हक्काचे पृष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात, वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाच्या लाभांत सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. १३/०४/२०२६ **(ॲड. महेंद्र यशवंत धामणे)**
मु.पो सुप्रीम कॉलनी नागोठणे, ता. रोहा, जि.रायगड
मो.नं. ९७६७२५०११०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे बोरगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्रीमती फाशीबाई गोपाळ पाटील, श्री संतोष गोपाळ पाटील, सारिका गोपाळ पाटील यांच्या कडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे बोरगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १३९ | १/अ | जमीन विक्री करणार यांच्या मालकीचे क्षेत्र ३.७८.०० त्यापैकी विक्री करण्याचे ठरलेले क्षेत्र १.४०.०० | ०.२९ |

तरी सदर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा आमच्या अशिलांच्या वर नमूद केलेल्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही आणि असल्यास त्यांनी ते हक्क हितसंबंध आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिलेत असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेण्यात येणार नाही.

ठिकाण : कर्जत
तारीख : १३/०४/२०२६

सही
**अधिवक्ता पौर्णिमा आनंद जाधव**
मो.नं. ९७६४५४७६४३
पत्ता- मार्लव क्षिप्रा मुद्रे बुद्रुक कर्जत

# शिक्षकांना जनगणनेची कामे कार्यक्षेत्रात द्यावे

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, प्राथमिक विभाग शाखा पेण यांच्या वतीने जनगणना कार्यासंदर्भात महत्त्वाचे निवेदन आज तहसील कार्यालयात सादर करण्यात आले. सदर निवेदन नायब तहसीलदार नितीन परदेशी यांना देण्यात आले.

या निवेदनामध्ये शिक्षकांची जनगणना कार्यासाठी नेमणूक करताना त्यांना त्यांच्या सध्याच्या कार्यक्षेत्रातच काम देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.





संबंधित शिक्षकांना त्यांच्या परिसराची भौगोलिक स्थिती, स्थानिक लोकसंख्या व इतर बाबींची चांगली माहिती असल्यामुळे जनगणना कार्य अधिक अचूक व सुलभ पद्धतीने पूर्ण होऊ शकते असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अनोळखी ठिकाणी नेमणूक केल्यास विविध अडचणी निर्माण होऊन कार्यात विलंब होण्याची शक्यता असल्याचेही शिक्षक परिषदेने स्पष्ट केले आहे.

सदर निवेदन देताना शिक्षक परिषदेचे तालुका अध्यक्ष महेंद्र गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अंकुश पाटील, खजिनदार महेश म्हात्रे तसेच प्रसिद्धी प्रमुख रामकृष्ण भोईर उपस्थित होते.

# श्रीकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

**माणगाव** : तालुक्यातील गोरेगाव कुंभारआळी येथील श्रीकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा व कलश पूजन कार्यक्रम सोमवारी (दि. १३), मंगळवारी (दि.१४) व बुधवारी (दि.१५) आयोजित करण्यात आला आहे. या मंदिराचा उद्घाटन सोहळा खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते होणार आहे. तरी या कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष सुभाष बामणोलकर, उपाध्यक्ष सुनील म्हशेलकर, महिला अध्यक्ष कविता रातवडकर, महिला उपाध्यक्ष नम्रता बामणोलकर, नवतरुण मंडळ अध्यक्ष मयूर बामणोलकर, उपाध्यक्ष साहिल म्हशेलकर यांनी केले आहे.

### जाहीर नोटीस

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग, शाखा कर्जत, नेरळ या पतसंस्थेतील खातेदारांना कळविण्यात येते की, श्री. गणेश विठ्ठल भोईर, मु. कोषाणे, कर्जत रायगड. व श्री. गणेश रामचंद्र लदगे, मु. वडवली पो. चिंचवली ता. कर्जत जि. रायगड व श्री. महेंद्र काशिनाथ लोभी, मु.पो. बीड बुद्रुक भवानी मंदिर जवळ ता. कर्जत जि. रायगड हे कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग शाखा कर्जत व नेरळ येथे अनुक्रमे हंगामी कर्मचारी व स्वल्प बचत प्रतिनिधी म्हणून काम करीत होते. मागील ६ महिन्यांपासून हे कर्मचारी पतसंस्थेमध्ये कामावर हजर न राहिल्याने संस्थेने त्यांना नोकरी वरुन काढून टाकले आहे. तरी पतसंस्थेच्या कोणत्याही कर्जदार अथवा खातेदाराने त्यांचेबरोबर आर्थिक रक्कमेचा व्यवहार करु नये. संस्थेच्या या कर्मचाऱ्यांबरोबर कोणत्याही कर्जदार अथवा खातेदाराने त्यांचेबरोबर आर्थिक व्यवहार केल्यास व संबधित कर्जदार अथवा खातेदाराचे पैसे गहाळ झाल्याचे पतसंस्थेच्या निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही त्या कर्जदार अथवा खातेदाराची असेल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

स्थळ : कर्जत
दिनांक : ०६/०२/२०२६

**कमळ नागरी सहकारी पतसंस्था अलिबाग**
कर्जत शाखा

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे धोंडपाडा, ता. पेण, जि.रायगड येथील सामाईक मालकीची शेत जमिन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल श्री. निलेश प्रभाकर खाडे, पत्ता - भारत ॲग्रो टेक, ऑफीस नं. ३ व ४, वाशी- वढाव रोड, वाशी नाका, पेण, ता. पेण, जि.रायगड ४०२१०७, मो.नं.८७६७३६३७४१ यांच्यासोबत सदर शेत जमिन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक अनुक्रमे १) श्री.ज्ञानेश्वर शिवराम भोईर, २) कै. वासुदेव शिवराम भोईर यांचे कायदेशीर वारस अ) पुरूषोत्तम वासुदेव भोईर (मुलगा), ब) मंजुळा हरिश्चंद्र माळी (मुलगी), सर्व रा. धोंडपाडा, पो. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड ४०२१०७ यांनी अनुमती दिलेली आहे. सदर शेत जमीन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| धोंडपाडा | ११७/५ | ०.२७.३० पो.ख. ०.०१.३० एकूण ०.२८.६० | २.८७ |

वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमिन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र ०.२८.६० हे.आर.चौ.मी. (२८.६० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत ही पूर्णतः हा निर्वेध बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या सामाईक शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील सामाईक मालकी असलेल्या शेत मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक १२/०४/२०२६

खरेदीदारांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

# तुमची यशोगाथा ठरणार इतरांसाठी प्रेरणा!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत ९एप्रिल पासून पुढील १५दिवस महिला सक्षमीकरण मोहिमेअंतर्गत व्यापक प्रसिद्धी अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश केंद्र व राज्य शासनाच्या महिलाभिमुख योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि लाभार्थ्यांच्या यशोगाथांना व्यासपीठ मिळवून देणे, हा आहे.

कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्यातील ज्या महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा (उदा. महिला बचत गट, कौशल्य विकास, अर्थसहाय्य योजना) लाभ घेऊन आपले जीवन समृद्ध केले आहे, अशा महिला तसेच शासन सेवेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिला यांनी आपली माहिती, फोटो किंवा छोटे व्हिडिओ आपल्या जिल्हयातील जिल्हा माहिती कार्यालयाकडे पाठवावेत, असे आवाहन विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभग यांनी केले आहे.

**अशा प्रकारे तुम्ही सहभागी होवू शकता**

विशेष प्रसिद्धी अभियानासाठी काही विशेष बाबींची आवश्यकता आहे. यामध्ये यशकथा : योजनेचा लाभ घेवून तुम्ही सुरू केलेला व्यवसाय किंवा प्रगतीबद्दलची माहिती, युझर जनरेटेड कंटेंट: योजनेच्या लाभार्थ्यांनी आपला फोटो किंवा योजनेच्या लाभासोबतचा सेल्फी पाठवावा., व्हिडिओ बाईट्स: आपला अनुभव सांगणारा छोटा व्हिडिओ किंवा मुलाखत. आपल्या जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाच्या ईमेल पत्त्यावर पाठवावे.

या यशोगाथांना स्थानिक वृत्तपत्रे, आकाशवाणी, सोशल मीडिया (फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स), आणि डिजिटल ई-बुकलेटच्या माध्यमातून राज्यस्तरावर प्रसिद्धी दिली जाणार आहे. स्थानिक इन्फ्लुएन्सर्सच्या माध्यमातूनही या मोहिमेचा प्रचार करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील इच्छुक महिला लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी व आपली माहिती देण्यासाठी आपापल्या जिल्हा माहिती कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

विभागीय माहिती कार्यायल, कोंकण भवन, नवी मुंबई ई-मेल आयडी **ddikon12@gmail.com,** प्रविण डोंगरदिवे-मो. ८६९३०९६६६, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे ई-मेल आयडी- **diothane2013@gmail.com,** अविनाश सकपाळ मो. ८३६९७०७५७२, जिल्हा माहिती कार्यालय, पालघर ई-मेल आयडी **diopalghar@gmail.com,** राम गोंदके मो. ७०२११५६४१४, जिल्हा माहिती कार्यालय, रायगड ई-मेल आयडी **dioraigad@gmail.com,** विठ्ठल बेंदुगडे मो. ९५२७४३६७५९, जिल्हा माहिती कार्यालय, रत्नागिरी ई-मेल आयडी **ratnagiridio@gmail.com,** योगेश रोडसिंग मो. ९०२१६३६९१३ यांना संपर्क करावा लागणार आहे.

महिलांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी आणि इतर महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण विभागीय उपसंचालक मनोज शिवाजी सानप यांनी केले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक जॉन अे. वाणीया यांचेकडुन कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६२ | ४ | ०-०८-०० | ०=०२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १२/०४/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, क्षेत्रीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव –** कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील रोहा (वगळून) ते मडुरे (समाविष्ट) स्थानकांदरम्यानच्या विभागात बोगदे, उपकेंद्रे, प्लॅटफॉर्म, अप्रोच रोड आणि सर्क्युलिटिंग क्षेत्र येथे उपलब्ध असलेल्या प्रकाश व्यवस्थेच्या दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक देखभाल करार. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/3/2026 दिनांक 13/04/2026, अंदाजित खर्च** – ₹ 1,60,89,088/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 3,21,800/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 04/05/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी वरिष्ठ क्षेत्रीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

# चेन्नईचा हंगामातील पहिला विजय

## ।। संजूच्या शतकानंतर गोलंदाजांची दमदार कामगिरी ।। दिल्लीचा सलग दुसरा पराभव

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२६ चा १८वा सामना चेन्नई येथील एमए चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सने दिल्ली कॅपिटल्सचा २३ धावांनी पराभव केला. या हंगामातील दिल्लीचा हा सलग दुसरा पराभव होता. सलग तीन पराभवांनंतर चेन्नईचा संघ मैदानात उतरला होता. 'करा किंवा मरा' अशा स्थितीत असलेल्या चेन्नईने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर दिल्लीवर मात केली. या विजयासोबतच चेन्नईला २ महत्त्वाचे गुण मिळाले आहेत. चेन्नईने आता ४ सामन्यांपैकी १ विजय आणि ३ पराभवांसह गुणतक्यात ९ व्या स्थानावर झेप घेतली आहे. दुसरीकडे या पराभवानंतर दिल्ली कॅपिटल्सचा संघ ४ सामन्यांत २ विजय आणि २ पराभवांसह ४ गुणांनिशी चौथ्या स्थानावर कायम आहे. मात्र, त्यांच्या नेट रनरेटवर याचा परिणाम झाला. सलग तीन पराभवांनंतर चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल २०२६ मधील आपला पहिला सामना जिंकला. चेन्नईने दिलेले २१३ धावांचे लक्ष्य गाठताना दिल्ली कॅपिटल्सचा संघ २० षटकांत १८९ धावांवर सर्वबाद झाला.



चेन्नईने दिलेल्या २१३ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सकडून ट्रिस्टन स्टब्सने सर्वाधिक ६० धावा केल्या. निस्सकांनंही ४१ धावांची शानदार खेळी केली. मात्र, इतर कोणत्याही खेळाडूने फलंदाजीत लक्षणीय योगदान दिले नाही, ज्यामुळे दिल्लीला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरं जावे लागले.

चेन्नई सुपर किंग्ससाठी जेमी ओव्हरटन सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्याने चार बळी घेतले. अंशुल कंबोजनंही तीन बळी घेतले. तर खलील अहमद, गुर्जपनीत सिंग आणि नूर अहमद यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

एमए चिदंबरम स्टेडियमवर नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना सीएसकेने निर्धारित २० षटकांत दोन गडी गमावून २१२ धावा केल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि संजू सॅमसन यांनी ६.२ षटकांत ६२ धावांची भागीदारी करून संघाला भक्कम सुरुवात करून दिली. गायकवाडने एका चौकारासह १८ चेंडूमध्ये १५ धावा केल्या. त्यानंतर संजूने आयुष म्हात्रेसोबत ६८ चेंडूमध्ये दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावा जोडून संघाला १७५ धावांपर्यंत पोहोचवले. म्हात्रेने चार षटकार आणि तीन चौकारांसह ३६ चेंडूमध्ये ५९ धावा करून निवृत्ती घेतली.

### संजू सॅमसनचे दमदार शतक

**संजूने ५२ चेंडूमध्ये आपले शतक पूर्ण केले, जे त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील चौथे शतक आहे. संजूने शिवम दुबेसोबत तिसऱ्या विकेटसाठी १५ चेंडूमध्ये नाबाद ३७ धावांची भागीदारी करुन संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. संजू ५६ चेंडूमध्ये ४ षटकार आणि १५ चौकारांसह ११५ धावांवर नाबाद राहिला, तर दुबे ३ चौकारांसह १० चेंडूमध्ये २० धावांवर नाबाद राहिला. दिल्ली कॅपिटल्सला एकमेव यश कर्णधार अक्षर पटेलने मिळवले, ज्याने ४ षटकांत ३९ धावा देऊन १ बळी घेतला.**

# पेण बाप्पा विरुद्ध समीरा हॅबिटेटेस अलिबाग

## जेट्स संघांत रंगणार अंतिम सामना

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।


रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुषांच्या खुल्या गटाच्या टी-२० प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धाचा अंतिम पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर पेण बाप्पा विरुद्ध समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स या दोन संघांमध्ये खेळवला जाणार आहे. शनिवारी झालेल्या प्ले ऑफ फॉरमॅटमधील उपांत्य फेरीच्या सामन्यात, पेण बाप्पा संघाने दमदार कामगिरी करत अंतिम सामन्यासाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात



पेण बाप्पा संघाने टीआयपीए पनवेल किंग्स संघावर २७ धावांनी विजय मिळवला.

प्रथम फलंदाजी करतांना पेण बाप्पा संघाने निर्धारित वीस षटकांमध्ये ३ गडी गमावत १९० धावसंख्या उभारली त्यामध्ये भावेश पाटील यांनी चौफेर फटकेबाजी करत सर्वाधिक ५५ धावा काढल्या तर जपजित सिंह ४५, विनय ठाकूर नाबाद ३३, योगेश पवार यांनी नाबाद ३४ धावा काढून संघाला मोठी धावसंख्य उभारण्यात योगदान दिले. टीआयपीए पनवेल किंग्स संघाकडून संकेत रानडे यांनी २ अमेय भोसले यांनी १ फलंदाज बाद केला.१९१ धावांचा पाठलाग करतांना पनवेल संघानी २० षटकांमध्ये ९ गडी गमावत १६३ धावा फलकावर नोंदवल्या त्यामध्ये सिद्धार्थ म्हात्रे यांनी सर्वाधिक ५९, रवी सोलंकी यांनी ३३ धावा काढून कडवी झुंज दिली. पेणकडून अष्टपैलू खेळाडू शेखर भगत यांनी टिचून गोलंदाजी करत पनवेल संघाचे ६ फलंदाज बाद करत संघाला विजय मिळवून दिला. भगत यांना सामनावीर म्हणून जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, जयंत नाईक, प्रशांत ओक यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# पायलला वर्ल्ड आर्चरीत सुवर्णपदक



। बँकॉक । वृत्तसंस्था ।

भारताची उदयोन्मुख पॅरा-तिरंदाज पायल नागने वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीजमधील महिलांच्या कंपाऊंड ओपन वैयक्तीक प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. बँकॉक इथे झालेल्या या स्पर्धेत तिने विद्यमान विश्वविजेती शीतल देवीचा १३९-१३६ असा पराभव केला. अंतिम सामन्याची सुरुवात अटीतटीची झाली. पहिल्या दोन फेऱ्यांनंतर दोन्ही तिरंदाज ५४ गुणांवर बरोबरीत होत्या. मात्र, सामना जसजसा पुढे सरकला, तसतसा पायलनं आपल्या खेळाचा दर्जा उंचावला. तिने तीन फेऱ्या खेळून निर्णायक आघाडी घेतली आणि एक संस्मरणीय विजय मिळवला. कझाकस्तानच्या जनात ऐतिमोवाला मागे टाकत ६९८ गुणांसह पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले.

या स्पर्धेत पायलने यापूर्वीच यश मिळवले होते. तिने शीतलसोबत जोडी करुन महिला दुहेरीमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. कंपाऊंड प्रकारात भारताची ताकद सिद्ध केली होती. मात्र, जेव्हा वैयक्तीक अंतिम फेरीची वेळ आली, तेव्हा पायलने दबावाखाली उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय मिळवला. पायल ही ओडिशाच्या बलांगीर जिल्ह्यातील एका स्थलांतरित मजुराची मुलगी आहे. २०१५ मध्ये, विटभट्टीमध्ये जिवंत विजेच्या तारेच्या संपर्कात आल्याने तिने आपले दोन्ही हात आणि पाय गमावले. यानंतर खचून न जाता तिनं २०२३-२४ दरम्यान, कटरा येथील माता वैष्णो देवी श्राइन बोर्ड स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये दिग्गज तिरंदाज शीतल देवीसोबत प्रशिक्षण घेतले. २०२५ मध्ये राष्ट्रीय स्तरावर पदार्पण केल्यानंतर, पायलने अल्पावधीतच मोठे यश मिळवले. जयपूरमधील एका स्पर्धेत तिने शीतल देवीचा पराभवही केला होता. याव्यतिरिक्त तिने यावर्षी खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये रौप्यपदक आणि राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले.

# साक्षीची क्रॉस कंट्रीत संधी हुकली

।मार्तंड बुचुडेपारनेर ।प्रतिनिधी ।

अळकुटीसारख्या छोट्याशा गावात जन्मलेली साक्षी भंडारी नाव जरी साधे असले, तरी तिच्या कर्तृत्वाची उंची आकाशाएवढी आहे. प्रतिकूल परिस्थितीशी रोज लढत, डोळ्यांत मोठी स्वप्नं घेऊन धावणाऱ्या या मुलीने राष्ट्रीय क्रॉस कंट्री स्पर्धेत २० वर्षांखालील महिला गटात जनरल चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक पटकावत आपले नाव देशभर गाजवले. सहा किलोमीटर धावण्यातही तिने रौप्यपदक जिंकत आपल्या मेहनतीची साक्ष दिली.



मात्र, या यशाच्या क्षणीही नियतीने तिच्यासमोर एक कठीण वळण उभे केले. फेब्रुवारीत जपानमध्ये होणाऱ्या एशियन क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी तिचे वय काही महिन्यांनी कमी पडल्याने तिची निवड होऊ शकली नाही. आयुष्यभरासाठी लक्षात राहील अशी ही संधी तिच्या हातातून निसटली. पण साक्षी खचली नाही. संधी हुकली तरी मनात नव्या लढाईची जिद्द तिने पेटवली आहे. घरची परिस्थिती अत्यंत बेताची. वडील आजारी, आई मोलमजुरी करून संसाराचा गाडा ओढणारी. पण, साक्षीने मात्र परिस्थितीसमोर हात टेकले नाहीत. वडिलांची सेवा, शिक्षणाची जबाबदारी आणि घरचा भार सांभाळत तिने धावण्याचा सराव थांबू दिला नाही. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये साक्षीने पारनेर येथील न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयात प्रथम वर्ष कला शाखेत प्रवेश घेतला. प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांचे प्रोत्साहन, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. संजय गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# चीनमध्ये भारतीय वाघाची डरकाळी

**निंगबो :** चीन येथे सुरू असलेल्या बॅडमिंटन आशिया चॅम्पियनशिपमध्ये आयुष शेट्टीने धडाकेबाज कामगिरी करत अंतिम फेरीत धडक मारली. आयुषने उपांत्य फेरीतील चुरशीच्या लढतीत थायलंडच्या वर्ल्ड नंबर १ आणि गतविजेत्या कुनलावत वितिदसर्नचा १०-२१, २१-१९, २१-१७ असा पराभव केला. पहिल्या गेममधील पिछाडीनंतर ऑलिम्पिकचा रौप्यपदक विजेता वितिदसर्नविरुद्ध आयुषची सुरुवात कठीण झाली. पहिला गेम त्याने गमावला. वितिदसर्नने गुणसंख्या १३-११ पर्यंत जवळ आणली होती, या लढतीत आयुषने तिसऱ्या गेममध्येही अभेद्य बचाव कायम राखत फायनल गाठली.

# पंजाब किंग्जकडून हैदराबादची शिकार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पंजाब किंग्जने सनरायझर्स हैदराबादचा सहज पराभव करीत आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत तिसऱ्या विजयाची नोंद केली. हैदराबादकडून मिळालेले २२० धावांचे लक्ष्य पंजाबने ६ फलंदाज आणि ७ चेंडू राखून १८.५ षटकांत ४ बाद २२३ धावा करीत पूर्ण केले. नाबाद ६९ धावांची खेळी करणारा कर्णधार श्रेयस अय्यर हा पंजाबच्या विजयाचा शिल्पकार ठरला. हैदराबादचा चार लढतीतील तिसरा पराभव ठरला. हैदराबादकडून मिळालेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना प्रियांश आर्य (५७) व प्रभसिमरन सिंग (५१) यांनी आक्रमक अर्धशतके ठोकून पंजाबच्या विजयाची पायाभरणी केली. चौकार ठोकले, तर प्रभसिमरनने २५ चेंडूंत ४ षटकार अन् तितकेच चौकार लगावले.

# जलतरणपटू ईश्वरी पांडेचा सत्कार

। नागपूर । प्रतिनिधी ।

अतिशय कठीण अशी पाल्कची सामुद्रधुनी यशस्वी पोहण्याची ऐतिहासिक व विश्वविक्रमी कामगिरी करून गुरुवारी (दि.९) एप्रिल रोजी नागपुरात परतलेली दृष्टिहीन जलतरणपटू ईश्वरी पांडे हिचे शहरात जंगी स्वागत करण्यात आले. तसेच घोड्यावर बसवून तिची मिरवणूक काढण्यात आली. १७ वर्षीय ईश्वरीने तीन दिवसांपूर्वी अथांग सागरातील भयंकर लाटा व धोकादायक समुद्री जिवांचा धैर्याने सामना करत



तलाईमन्नार (श्रीलंका) ते धनुष्कोडी (भारत) ही ३८ किमी अंतराची पाल्कची सामुद्रधुनी अवघ्या ११ तास १५ मिनिटांत पोहून पार करीत विश्वविक्रम केला होता. ही मोहीम फत्ते करणारी ईश्वरी जगातील पहिली दृष्टिहीन जलतरणपटू ठरली होती.

कुटुंबीय, नातेवाईक व क्रीडा विश्वातील चाहत्यांनी नागपूर रेल्वे स्थानकाबाहेर ईश्वरी व तिचे एनआयएस प्रशिक्षक संजय बाटवे यांचे जोरदार स्वागत केले. याप्रसंगी कमलेश पांडे, अरुणा पांडे, अजय बुग्गेवार, अविनाश देऊस्कर, संजय लोखंडे, डॉ. शारदा नायडू, शशांक बोकारे, सुखदेव धुर्वे उपस्थित होते.

## निवडक

# दिल्लीत रायगडच्या सुपुत्रांचा सन्मान!




**नेरळ :** रायगड जिल्ह्याचा गौरव वाढवणारी अभिमानास्पद घटना घडली असून, कर्जत तालुक्यातील अँटी करप्शन बोर्डच्या पदाधिकाऱ्यांचा थेट देशाची राजधानी दिल्लीमध्ये भव्य सन्मान करण्यात आला. विविध राज्यांतील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात रायगडच्या सुपुत्रांनी आपली छाप पाडली. कर्जत तालुक्यातील अँटी करप्शन बोर्डच्या तीन पदाधिकाऱ्यांचा दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे आयोजित भव्य सन्मान सोहळ्यात गौरव करण्यात आला. रविवारी(दि.१२) एप्रिल रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात देशभरातील विविध राज्यांतील पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्याची दखल घेत सन्मानित करण्यात आले. अँटी करप्शन बोर्डचे नॅशनल प्रेसिडेंट आर. के. जैन तसेच अँटी करप्शन वुमन सेलच्या नॅशनल प्रेसिडेंट ज्योती जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अण्णासाहेब खैरनार यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.यामध्ये कर्जत तालुक्यातील देवपाडा येथील भरत पांडुरंग राणे यांना 'भारत की शान' या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच रामदास जनार्दन माळी आणि काशिनाथ धुळे यांना 'ॲक्टिव्ह मेंबर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या तिन्ही पदाधिकाऱ्यांच्या सन्मानामुळे कर्जत तालुक्यासह रायगड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या सोहळ्यात अँटी करप्शन बोर्ड, के लाईन टाइम्स आणि युनिटी ऑफ प्रेस अँड मीडिया असोसिएशन यांच्या संयुक्त सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देशातील विविध राज्यांमधून मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रासह पंजाब, हरियाणा, तेलंगणा, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, तामिळनाडू आदी राज्यांतील प्रतिनिधींनी या सोहळ्यास हजेरी लावली. एकूण ५२ पुरस्कार प्रदान करण्यात आले असून त्यापैकी २१ पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील पदाधिकाऱ्यांना मिळाले. 'भारत की शान', 'बेस्ट लीडरशिप', 'ॲक्टिव्ह मेंबर' तसेच 'हॉनरी डॉक्टरेट' अशा विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले. रायगड जिल्ह्यातील या पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेल्याने त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गुजरातचा सलग दुसरा विजय



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेत गुजरात टायटन्सने रविवारी (दि.१२) एप्रिल रोजी लखनौ सुपर जायंट्सला त्यांच्या घरच्या मैदानात पराभूत केले. गुजरातने ७ विकेट्सने विजय मिळवत सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. गुजरातने गेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सला केवळ १ धावेने पराभूत केल्यानंतर या सामन्यात मात्र दणदणीत विजय मिळवला. गुजरातने आता ४ सामन्यांपैकी २ सामने जिंकल्याने त्यांचे ४ गुण झाले आहेत. गुजरातच्या या विजयात शुभमन गिल, जॉस बटलर आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी मोलाचा वाटा उचलला. या सामन्यात लखनौने १६५ धावांचे लक्ष्य गुजरात समोर ठेवले होते. हे लक्ष्य गुजरातने १८.४ षटकात ३ विकेट्स गमावत सहज पूर्ण केले. गुजरातकडून शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांनी डावाची सुरुवात केली. त्यांनी सुरुवात चांगली केली होती. त्यांच्यात ४५ धावांची भागीदारी झालेली होती, पण ६ व्या षटकात सुदर्शनला १५ धावांवर दिग्वेश राठीने आवेश खानच्या हातून झेलाबाद केले. बटलरने ३७ चेंडूत ६० धावांची खेळी केली, ज्यात त्याने ११ चौकार मारले. पण तोपर्यंत गुजरातसमोरील समीकरण सोपे झाले होते. उर्वरित धावा वॉशिंग्टन सुंदर आणि राहुल तेवतिया यांनी पूर्ण केल्या. वॉशिंग्टन सुंदरने १३ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या, तर राहुल तेवतियाने ८ चेंडूत नाबाद १० धावा केल्या. तत्पुर्वी, लखनौने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ बाद १६४ धावा केल्या होत्या. लखनौकडून एडेन मार्करमने २१ चेंडूत ३० धावांची खेळी केली. पण बाकी कोणालाही २० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. परंतु, ७ फलंदाजांनी १० धावांचा आकडा पार केला. त्यामुळे लखनौली १६० धावांचा टप्पा पार करता आला. गुजरातकडून प्रसिद्ध कृष्णाने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या आहेत. अशोक शर्माने २ विकेट्स घेतल्या. मोहम्मद सिराज आणि कागिसो रबाडा यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

## आधुनिक खेळ आता मॅट्सवर | मातीचा सुगंध आता डिजिटल स्क्रीनवर

# भारतीय 'खो-खो'चा नवा प्रवास

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

खो-खो हा केवळ खेळ नसून तो भारताचा, विशेषतः महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे. पुणे ही या खेळाची जन्मभूमी. महाराष्ट्राच्या मातीमधून सुरु झालेला हा प्रवास आज आधुनिक मॅट्सवर पोहोचला आहे. मात्र, खेळाचा वेग वाढला असला तरी त्याचे व्यवस्थापन अजूनही काही बाबतीत जुन्या पद्धतींवर अवलंबून आहे.

आज खो-खो भारतातील ६८० पेक्षा जास्त जिल्ह्यांत आणि




जगातील ५६ देशांत खेळला जातो. ३० लाखांहून अधिक सक्रिय खेळाडू या खेळाशी जोडलेले आहेत.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि खो-खोचा वारसा १८८४ मध्ये पुण्यात स्थापन झालेली डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही भारताच्या शैक्षणिक आणि क्रीडा वारशाचा एक मुख्य आधारस्तंभ आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांसारख्या विचारवंतांनी राष्ट्रीय चारित्र्य घडवण्यासाठी खेळांना अत्यंत महत्त्वाचे मानले होते. खो-खोच्या इतिहासातील सर्वात निर्णायक क्षण १९१४ मध्ये आला, जेव्हा लोकमान्य टिळक आणि त्यांचे सहकारी भाई नेरुरकर यांनी खो-खोची पहिली अधिकृत नियमपुस्तिका तयार करून प्रकाशित केली. टिळक आणि नेरुरकर यांनी रचलेल्या या पायामुळेच आज खो-खो आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे.

खो-खोमध्ये अजूनही मॅन्युअल स्कोअरशीट वापरल्या जातात, ज्यामुळे, मानवी चुकांचे प्रमाण वाढते, निकालांना विलंब होतो, खेळाडूंच्या कामगिरीचा ऐतिहासिक डेटा उपलब्ध राहत नाही. या ॲपची चाचणी अनेक जिल्हा, शालेय, विद्यापीठ व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यशस्वीरित्या करण्यात आली असून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या कोअर कमिटीने या तंत्रज्ञानाचे विशेष कौतुक केले आहे.

### डिजिटल स्कोअरशीट

**कागदी स्कोअरशीटची जागा आता पूर्णतः डिजिटल प्रणाली घेईल, ज्यामुळे वेळ आणि श्रम ४५ टक्के वाचतील. सामन्याचा लाईव्ह स्कोअर, आकडेवारी आणि खेळाडूंचे विश्लेषण एका क्लिकवर उपलब्ध होईल. खेळाडू मैदानात कुठे जास्त सक्रिय होता, त्याचे पॉइंट्स मिळवण्याचे तंत्र काय होते, याचे ग्राफिकल सादरीकरण केवळ गुण मिळवणाऱ्या खेळाडूचेच नाही, तर त्याला मदत करणाऱ्या खेळाडूचेही मूल्यमापन यातून होईल.**

# ठाण्यात राज्यस्तरीय कबड्डीचा जल्लोष

**ठाणे :** १०१ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या मावळी मंडळाच्या ७३ व्या राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेला १४एप्रिल रोजी सायं. ५-००वा.पासून शानदार सुरुवात होईल. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. व ठाणे जिल्हा कबड्डी असो.च्या मान्यतेने ठाण्यातील मावळी मंडळाच्या चरई येथील भव्य पटांगणार दि. १४ ते १८ एप्रिल या कालावधित हे सामने रंगतील. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा या प्रथम साखळी व नंतर बाद पद्धतीने सामने खेळविले जातात. पण श्री मावळी मंडळ अशी एकमेव संघटना आहे की फक्त त्यांना राज्य संघटनेने पहिल्यापासुन सर्व सामने बाद पद्धतीने खेळविण्याची परवानगी दिली गेली आहे. या स्पर्धेत ७० पुरुष, तर ३८ महिला संघानी आपला सहभाग घेतला आहे. स्पर्धेत विजयी होणाऱ्या पुरुष व महिला गटातील सर्व संघाना समान पारितोषिके देण्यात येतील. अंतिम विजयी होणाऱ्या संघाना रोख रु. एकावन्न हजार ५१००० व चषक, उपविजयी संघाना रोख रु. एकतीस हजार ३१००० व चषक प्रदान करण्यात येतील. उपांत्य उपविजयी सर्व संघाना रोख रु. अकरा हजार ११००० व चषक देण्यात येईल. स्पर्धेत सर्वोत्तम ठरणाऱ्या खेळाडूना रोख रु. पाच हजार ५००० तर स्पर्धेत उत्कृष्ट चढाई व पकडीच्या सर्व खेळाडूंना रोख रु.तीन हजार ३००० देऊन गौरविण्यात येईल. अशी माहिती एका पत्रकाद्वारे मंडळाचे विश्वस्त व अध्यक्ष सुधाकर मोरे यांनी सर्व प्रसार माध्यमाना दिली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)